**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

(शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 पासून)

वर्ग:- तृतीय वर्ष वाणिज्य शाखा (T.Y.B.Com.)

विषय:- भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास-I

सेमिस्टर :- V

SBM RAJGURUNAGAR Eco. DEPT

मार्गदर्शक प्राध्यापक

डॉ. उमेश भोकसे - व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख

## प्रकरण पहिले

## 1. भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्था

१. प्रस्तावना

सामान्यपणे कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री, वित्तीय भांडवल, मानवी भांडवल व त्याचा दर्जा या संसाधनाच्या

कार्यक्षम वापरावर अवलंबून असतो. देशाच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात अर्थतज्ञामध्ये काळानुसार विविध दृष्टिकोन विकसित झाल्याचे दिसून येते सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत नैसर्गिक संसाधने व भौतिक भांडवलाला अधिक महत्त्व दिले तर आधुनिक अर्थतज्ज्ञांनी मानवी भांडवलाच्या विकासाकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसून येते.

आजच्या प्रगतशील जगात आर्थिक विकास ही संकल्पना महत्वाची मानली जाते. त्यामुळे अर्थतज्ञ आर्थिक विकासाला केंद्रबिंदू मानून अध्ययन व चिंतन करीत असल्याचे दिसून येतात. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्राच्या उत्पादकतेच्या स्तरात वाढ पडवून आणणे म्हणजे आर्थिक विकास होय. अधिक स्पष्ट शब्दात सांगायचे झाल्यास आर्थिक विकास म्हणजे उत्पादन, उत्पन्न, राहणीमान व उत्पादन तंत्र यामध्ये अनुकूल बदल होणे होय. थोडक्यात, लोकांच्या उत्पन्नात वाढ होणे, दारिद्र्य कमी होऊन मानसिक समाधानाच्या पातळीमध्ये वाढ होणे म्हणजेच आर्थिक विकास होय. अशाप्रकारे अलीकडच्या काळात आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली जात आहे.

अर्थतज्ञाने आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धीच्या व्याख्या बाबत वेगवेगळे दृष्टिकोन मांडले आहेत. काहींच्या मते आर्थिक वृद्धीचा अर्थ एकूण राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ होय, तर काहींच्या मते राष्ट्रीय उत्पन्नात होणारी संख्यात्मक वाढ होय, तर आर्थिक विकास म्हणजेच वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ होय. आर्थिक विकास ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असून तिचा संबंध विकसनशील अर्थव्यवस्थेशी असतो. थोडक्यात आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास हे अनुक्रमे देशाच्या संख्यात्मक व गुणात्मक विकासाचे निर्देशक आहेत. देशाच्या प्रगतीचे मोजमाप सामान्यतः त्यांच्या आधारे केले जाते.

अमर्त्य सेन यांच्या मते, ते विकास म्हणजे लोकांसाठी स्वातंत्र्य निर्माण करणे आणि आणि अधिकाधिक स्वातंत्र्यासाठी असलेले अडथळे दूर करणे होय. अधिक स्वातंत्र्य लोकांना त्यांचे स्वतःचे नशीब निवडण्यास सक्षम करते. स्वातंत्र्य म्हणजेच विकासास असलेल्या अडथळा मध्ये दारिद्र्य, आर्थिक संधीचा अभाव, भ्रष्टाचार, दुर्बल प्रशासन, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्य सुविधेचा अभाव यांचा समावेश होतो. यादृष्टीने अमर्त्य सेन यांचा आर्थिक विकासाचा क्षमतावृद्धी दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो.

१.२.१ आर्थिक विकास अर्थ, व्याख्या आणि निर्देशक

१. आर्थिक विकासः अर्थ व व्याख्या:

आर्थिक विकास ही आर्थिक वृद्धी पेक्षा व्यापक संकल्पना आहे. तसेच ती एक गुणात्मक संकल्पना आहे. आर्थिक विकास या संकल्पनेत केवळ आर्थिक घटकामध्येच नव्हे तर जीवनाच्या इतर सर्व क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदलांचा समावेश होतो. आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरणातील इच्छित बदल आणि इतर तांत्रिक व संस्थात्मक बदल यांचा समावेश होतो.

आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये अर्थव्यवस्था ही सर्व क्षेत्रातील उत्पादकतेची उच्च पातळी गाठते आणि त्यासाठी ती प्रामुख्याने प्रगत तंत्रज्ञानावर आधारलेली असते तसेच असे प्रगत तंत्रज्ञान बनविण्यासाठी तेथील समाज सक्षम असतो. थोडक्यात, विकास म्हणजे वृद्धी आणि बदल यांचे एकत्रीकरण होय. हा बदल सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक घटकाच्या संदर्भात घडून येतो.

२. आर्थिक विकासाच्या संकल्पना :

आर्थिक विकासाची संकल्पना समजून घेण्यासाठी पुढील व्याख्या उपयुक्त ठरतील.

१) प्रा. मायर आणि बाल्डविन यांच्यामते, " आर्थिक विकास ही एक सतत चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया असून यामध्ये एकूण अर्थव्यवस्थेतील वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येत असते".

२) किंडल बर्जर यांच्या मते, " आर्थिक विकास म्हणजे ज्या प्रक्रियेमुळे अधिक उत्पादन शक्य होते अशा तांत्रिक आणि संस्थात्मक व्यवस्थेतील बदल होय"..

३) प्रो. विलियमसन यांच्या मते, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत एका विशिष्ट देशात किंवा परदेशात राहणाऱ्या व्यक्ती उपलब्ध संसाधनाचा उपयोग दरडोई उत्पादनात वाढ करण्यासाठी होत असतो.

४) संयुक्त राष्ट्रसंघाच्या मते, आर्थिक विकासाचा अर्थ मानवाच्या केवळ भौतिक गरजांमध्ये वाढ होणे असा नसून, व्यक्तीच्या सामाजिक संस्कृतीक व आर्थिक स्थितीमध्ये गुणात्मक सुधारणा करणे होय.

वरील सर्व व्याख्या वरून असे लक्षात येते की आर्थिक विकास हो एक एक सतत चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया असून ज्यामध्ये वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व तांत्रिक संरचना यासारख्या घटकामध्ये उपलब्ध संसाधनाचा पर्याप्त वापर करून मोठे बदल पडून आणणे व शाश्वत विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. थोडक्यात, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत

अर्थव्यवस्थेत संख्यात्मक बदला ऐवजी गुणात्मक बदल घडून येतात. यावरून आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतात.

आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये:

१) गतिमान व सतत प्रक्रियाः

आर्थिक विकास ही एक गतिमान व सतत चालणारी प्रक्रिया आहे. आर्थिक विकासाची प्रक्रिया हो गतिमान असते. कारण आर्थिक विकासाशी संबंधीत सर्व घटक हे बदलणारे असतात आणि अशा बदलातून आर्थिक विकास पडून येतो. स्थैतिक व्यवस्थेत बदल घडवून तीला गतिमान करण्यासाठीचे सर्व प्रयत्न आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत केले जातात.

२) दीर्घकालीन प्रक्रियाः

आर्थिक विकास ही विशिष्ट कालावधीत घडून येणारी प्रक्रिया नसून दीर्घकाळात नियोजनबद्ध रितीने तो पार पाडावी लागते. अपेक्षित उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून दिर्घकालीन प्रयत्नांचा पाठलाग यामध्ये अभिप्रेत असतो. कारण निरंतर पद्धतीने केलेले असे प्रयत्नव विकासाची मुलभूत उद्दिष्ट्ये साध्य करण्यात साहाय्यभूत ठरतात. बदल, विकास, वाढ या गोष्टी दीर्घकाळातच शक्य होतात.

३) स्थूल स्वरुपाची प्रक्रिया :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशातील विकासाचा विचार करताना तो स्थूल स्वरूपात म्हणजे संपूर्ण राष्ट्रांचा विचार अभिप्रेत असतो, त्यामुळे त्यात

कोणत्याही एका विशिष्ट घटकाचा विचार बात केला जात नसल्याने आर्थिक विकासाची प्रक्रिया ही स्थूल स्वरुपाची असते.

४) आर्थिक वृद्धी :

आर्थिक विकासाची प्रक्रिया ही त्या राष्ट्राला आर्थिक वृद्धीच्या दिशेने घेऊन जाते. म्हणजे जेव्हा एखाद्या देशाचा आर्थिक विकास घडून येत असतो तेव्हा त्या देशाच्या उत्पादन, रोजगार, उत्पन्न, उपभोग, बचत, गुतवणूक अशा सर्वच गोष्टीत सातत्याने भर पडत असते, आर्थिक विकासामुळे आर्थिक वृद्धी होते परंतु आर्थिक वृद्धीमुळे आर्थिक विकास होतोच असे निश्चितपणे म्हणता येत नाही. आर्थिक विकास हा पूर्वीच्या स्तरावरुन आणखी वरच्या स्तरावर जातो म्हणजे त्यात भर पडून आर्थिक वृद्धी पडून येते.

५) वास्तव राष्ट्रीय उत्पादन व दरडोई उत्पन्नात वाढ :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्न सातत्यपूर्ण रितीने वाढत जाते तेव्हा पर्यायाने त्या देशातील प्रतिव्यक्ती उत्पन्न देखील वाढ होते. म्हणजेच आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत वास्तव राष्ट्रीय उत्पादन आणि दरडोई उत्पन्नात वाढ होते.

६) साधनसामग्रीचा पर्याप्त वापर :

प्रत्येक देशातील नैसर्गिक संसाधने (जमीन, हवा, पाणी, खनिजे, नैसर्गिक वायु, तेल इ.) ही आर्थिक विकासासाठी आवश्यक अशी बहुमुल्य संपत्ती असते. या संपत्तीचा अपव्यय न करता तो जर वापरली आणि प्रति मात्रा तीची उत्पादकता जर वाढविली तर आर्थिक विकासाला गती मिळू शकते.

७) तंत्रज्ञानाचा वाढता वापर

प्रगत तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वास हे आर्थिक विकासाचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान व त्याचा वापर, यंत्रसामग्री, भांडवली संसाधने, विद्युत-पवन व सौरशक्ती, सौर व बायोगॅस या व अशा सर्व प्रकारच्या उत्पादनाच्या संसाधनाचा पूरेपूर वापर करून आर्थिक विकास साध्य करण्याकरता तंत्रज्ञानाचा वाढता वापर अनिवार्य असतो.

८) सामाजिक, सांस्कृतिक व संस्थात्मक बदल :

आर्थिक विकास होत असताना जे बदल घडून येतात ते केवळ आर्थिक वा मौलिक स्वरुपाचे असण्याबरोबरच ते सामाजिक, सांस्कृतिक व संस्थात्मक चौकटीतील संरचनात्मक बदलांशी संबंधीत असतात, मोडल्यात विकासाच्या या प्रक्रियेचे स्वरुप समग्र तसेच बहुव्याप्त स्वरूपाचे असते.

९) संख्यात्मक व गुणात्मक

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये विकासाशी संबंधीत सर्व घटकामध्ये जी वाढ घडून येणे अभिप्रेत असते ती केवळ संख्यात्मक असून चालत नाही तर ती गुणात्मक असावी लागते. जसे की विकासामध्ये त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पादन, बचत, भांडवल, गुंतवणूक इ. मध्ये वाढ व्हावी लागते. पण त्याच बरोबर या सर्वांना सामावून घेणारी पूरक व तीतकीच परिवर्तनशील व कालानुरुप अशी सामाजिक, राजकीय, तांत्रिक, शैक्षणिक सांस्कृतिक आणि संस्थात्मक चौकट निर्माण होणे गरजेचे आहे.

१०) उत्पन्न व संपत्ती:

योग्य आणि समानतेच्या तत्त्वावर देशातील एकुण उत्पन्न व संपत्तीचे समाजात वाटप होणे हे आर्थिक विकासाचे मुलभूत लक्षण असते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असताना देशातील सर्वसामान्य लोकांच्या वास्तव उत्पन्नात न वाढ होता काही मोजक्याच लोकांच्या उत्पन्नात वाढ होत असेल तर देशातील आर्थिक विषमता वाढतेचे प्रमाण वाढते. परिणामी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. थोडक्यात निरंतर व गतिमान आर्थिक विकासासाठी उत्पन्न व संपत्तीचे वितरण समान प्रमाणात होणे आवश्यक आहे.

११) राहणीमानाच्या दर्जात सुधारणाः

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशाचे राष्ट्रीय उत्पन्न दरडोई उत्पन्न व लोकांच्या वास्तव उत्पन्नात वाढ झाल्यामुळे लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होते. परिणामी देशातील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावतो.

अशाप्रकारे आर्थिक विकास ही एक सतत व दीर्घकालीन प्रक्रिया असून यामध्ये वास्तव राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात वाढ, दारिद्र्य आणि विषमतेतिल घट, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिवर्तन, लोकांच्या आर्थिक कल्याणामध्ये वाढ, साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर, तांत्रिक प्रगती, उत्पादकता व कार्यक्षमतेत वाढ, उत्पन्नाचे समन्यायी वाटप. लोकांच्या राहणीमान व जीवनमानाच्या दर्जात सुधारणा ही आर्थिक विकासाची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

आर्थिक विकासाचे निर्देशकः

एखाद्या देशाचा झालेला किया होत असलेला आर्थिक विकास मोजण्यासाठी ज्या घटकांचा वापर केला जातो त्यास आर्थिक विकासाचे निर्देशक असे म्हणतात. आर्थिक विकासाची संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची आहे. तसेच ती दोन अर्थव्यवस्थेसाठी स्पर्धात्मक झाली आहे. त्यामुळे आर्थिक विकासाचे मापन कसे होते? त्या पद्धतीमध्ये कोणकोणते घटक असावेत ? प्रगतीच्या कोणत्या थराला आर्थिक विकासाचे निर्देशक मानावे? याविषयी अर्थतज्ञामध्ये मतभेद दिसून येतात. आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी पुढील निर्देशक वापरले जातात.

१) राष्ट्रीय उत्पन्न :

आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न या प्रमुख निर्देशकाचा वापर केला जातो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची वास्तव स्थिती लक्षात येते देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यास दरडोई उत्पन्नात वाढ होऊन मानव विकास निर्देशांक वाढतो. तसेच देशाच्या आर्थिक विकासाची गती राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असते. देशातील लोकांचे राहणीमान आणि आर्थिक कल्याण हे राष्ट्रीय उत्पन्नावरुन लक्षात येते. एका विशिष्ट कालखंडात देशात उत्पादित झालेल्या अंतिम वस्तु व सेवांचे मूल्य म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न होय.

दीर्घ काळात देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाद होत असेल तर या देशाचा आर्थिक विकास होत आहे असे म्हणता येईल. थोडक्यात, कोणत्याही देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे आवश्यक असते.

राष्ट्रीय उत्पन्न या निर्देशकाच्या आधारे आर्थिक विकासाचे मोजमाप करताना देशातील वाढत्या लोकसंख्येचा विचार केला जात नाही. देशाच्या राष्ट्रीय

उत्पन्नातील वाढीबरोबर लोकसंख्येत त्याच प्रमाणात वाढ होत असेल तर दरडोई उत्पन्न आणि वास्तव उत्पन्न यामध्ये वाढ होऊ शकणार नाही. याबरोबरच बाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण योग्य प्रकारे होणे आवश्यक असते. देशातील मोजक्याच लोकांच्या उत्पन्नात वाढ होत असेल तर आर्थिक विषमता वाढून आर्थिक विकासाची गती मंदावते.

आर्थिक विकासाची तुलना करण्यासाठी व त्या देशाची आर्थिक विकासाची स्थिती लक्षात घेण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना अत्यंत उपयोगी असल्याचे दिसून येते. यु एस ए. जपान, जर्मनी आणि चीन या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न भारतापेक्षा अधिक आहे. म्हणून या देशाचा आर्थिक विकास भारताच्या तुलनेत अधिक असल्याचा निष्कर्ष काढता येतो. तसेच रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न भारतापेक्षा कमी असल्यामुळे, रशियाचा आर्थिक विकास भारताच्या तुलनेत कमी आहे. असे म्हणता येते. अशाप्रकारे राष्ट्रीय उत्पत्राच्या आकडेवारीवरून देशाच्या विविध क्षेत्रात झालेली प्रगती, देशातील लोकांचे आर्थिक कल्याण व आर्थिक विषमतेची स्थिती लक्षात येते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रीय उत्पनाची संकल्पना महत्वाची ठरते.

२) दरडोई उत्पन्नः

देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील लोकसंख्येने भाग दिला असता दरडोई उत्पन्न मिळते. देशाच्या दरडोई उत्पन्नात दीर्घ काळात सतत वाढ होत असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास होत असतो, वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढमुळे दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदून लोकांच्या राहणीमानात वाढ करणे शक्य होते. राहणीमानाच्या दर्जात वाढ करणे आणि एकूणच जीवनमानाचा दर्जा सुधारणे हे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट असते. वास्तव दरडोई उत्पन्न यावरून

विशिष्ट काळात देशातील प्रत्येक व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा सरासरीने किती उंचावला आहे ही घटला आहे हे समजू शकते, म्हणून दरडोई उत्पन्न वाढीची ही पद्धती आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी अधिक योग्य ठरते.

दरडोई उत्पन्न या निर्देशकामध्ये देशातील वाढलेल्या लोकसंख्येचा विचार केला असला तरी, वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाचे फायदे काही मोजक्याच लोकांना मिळत असतील तर श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होऊन आर्थिक विकासाची गती मंदावते.

आधुनिक अर्थशास्त्र त्याच्या मते, राष्ट्रीय उत्पन्न बरोबरच दरडोई उत्पन्न हा सुद्धा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशक आहे. कारण अविकसित देशाचा मुख्य प्रश्न जीवनमाण व राहणीमानाच्या सुधारण्याशी संबंधित असतो. लोकांचे कल्याण व जीवनमानात सुधारणा या दृष्टीने पाहिल्यास देशाच्या दरडोई उत्पन्नावरून आर्थिक विकासाची कल्पना येते.

भारताची लोकसंख्या इतर विकसित देशांच्या तुलनेत खूपच जास्त असल्यामुळे दरडोई उत्पन्न कमी येते, तसेच अतिरिक्त लोकसंख्यामुळे आर्थिक विकासाची गती मंदावते. देशाची लोकसंख्या कमी असेल तर राष्ट्रीय उत्पन्न कमी असूनही देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न जास्त असते.

थोडक्यात, राष्ट्रीय उत्पन्ना पेक्षा दरडोई उत्पन्न ह्या आर्थिक विकासाच्या निर्देशका मध्ये देशाच्या वास्तव आर्थिक स्थितीचा अधिक योग्य अंदाज येत असल्याचे दिसून येते. लोकसंख्येतील अतिरिक्त वाढ, निसर्गिक साधनांचा अपर्याप्त वापर, औद्योगीकरणाची मंद गती, शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव, शासनाचे चुकीचे धोरण, निकृष्ट दर्जाचे मानवी भांडवल, शेतीची व श्रमिकांची अल्प उत्पादकता या कारणामुळे भारताचे दरडोई उत्पन्न कमी असल्याचे दिसून येते.

३) आर्थिक कल्याण:

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास किती झाला हे पाहण्यासाठी त्या देशातील नागरिकांच्या कल्याण किती बाढ झाली हे पाहिले जाते. आर्थिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नामुळे आर्थिक कल्याण भर पडली असेल तर आर्थिक विकास झाला असे म्हटले जाते. आर्थिक विकास आणि आर्थिक कल्याण यामध्ये सहसंबंध असतो, असे मत रीचर्डसन यांनी मांडले आहे. त्या दृष्टिकोनातून विचार केल्यास विकसनशील देशानी हाती घेतलेल्या विकास योजनांमधून सामान्य जनतेच्या आर्थिक कल्याणात वाढ झाली पाहिजे. देशातील लोकांची आर्थिक कल्याण हे पुढील दोन बाबीवर अवलंबून असते.

१) राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप आर्थिक विकास होत असताना निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप समाजातील विविध घटकांमधील योग्य प्रकारे झाले पाहिजे, तरच सर्व समाजाला वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा फायदा मिळेल. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वांचा सहभाग वाटेल. याउलट राष्ट्रीय उत्पन्नाचे विषम वाटप झाल्यास समाजातील भिन्न घटकांमध्ये असंतोष निर्माण होऊन आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतील.

२) किंमत स्थीरता : देशातील लोकांजवळ उपलब्ध असलेल्या खरेदी शक्ती वर देशातील लोकांचे कल्याण अवलंबून असतो. पैशाची क्रयशक्ती वाढून लोकांच्या खरेदी शक्तीत वाढ होत असल्यास देशातील लोकांच्या आर्थिक कल्याणा भर पडते. विकासकाळात राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असतांना किंमत पातळी स्थिर राहिली किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात त्यामध्ये वाढ झाली तरी देशातील लोकांच्या आर्थिक कल्याणात निश्चितच वाढ होईल.

आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी एका बाजूने राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण आणि दुसऱ्या बाजूने किंमत पातळी स्थिर ठेवणे आवश्यक ठरते.

अशाप्रकारे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असताना उत्पन्नाचे वितरण समन्यायी होणे आवश्यक असते तरच देशातील लोकांच्या कल्याणात वाढ होईल. देशातील कामगारांचे आर्थिक शोषण होत असेल तर आणि त्यांना कामाच्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध होत नसतील तर देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊनही आर्थिक कल्याणात घट होते. अशा स्थितीत उत्पादन किती झाले यापेक्षा ते कसे झाले हे महत्त्वाचे ठरते. थोडक्यात आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आर्थिक कल्याण या निकषाल सुद्धा काही मर्यादा असल्याचे दिसून येते.

४) सामाजिक निर्देश

आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वरील पद्धतीत दोष असल्याचे दिसून आल्याने मौरिस डी. मॉरिस, प्रा. मावेर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी 'सामाजिक निर्देशकांचा वापर केला आहे. त्यात आरोग्य, अन्न व प्रथिनांचे सेवन, साक्षरता, तंत्रशिक्षण, रोजगारातील कामाच्या ठिकाणची परिस्थिती, मूलभूत गरजांसाठीचा उपभोग राहण्यासाठी चांगल्या घरांच्या सोयी, कपडेलते, खेळ, मनोरंजन व सामाजिक सुरक्षितता इत्यादी निर्देशकांचा समावेश केल्याचे आढळते. या सर्वामधून आर्थिक विकास प्रक्रियेची गुणात्मक बाजू लक्षात येते.

प्रा. मायर यांनी दरडोई उत्पन्न, लोकांचे व्यावसायिक वर्गीकरण, ग्रामीण व शहरी लोकसंख्या, वयोमानाप्रमाणे वर्गीकरण, विकासाचा वेग इत्यादींच्या साहाय्याने निरनिराळ्या देशांच्या आर्थिक विकासची तुलना केली आहे. देशाच्या आर्थिक विकासाची स्थिती लक्षात घेण्यासाठी त्यांनी पुढील निर्देशक विचारात घेतले आहेत.

१. उपभोग निर्देशकः अन्न, वस्त्र, निवारा, ऊर्जा इत्यादींवरील दरडोई खर्च यात विचारात घेतला जातो.

२. उत्पन्न निर्देशक: यामध्ये उत्पन्न व संपत्तीचा विचार केला जातो.

३. बचत निर्देशक: दरडोई बचत, कर्ज व त्याची रचना इ. विचारात घेतले जाते.

४. रोजगार निर्देशकः एकूण रोजगार त्यातील कृषी क्षेत्रातील रोजगाराचा हिस्सा कामाचे सरासरी दिवस, दरहजारी काम करनारांचे चे प्रमाण

५. आरोग्य निर्देशक साथीच्या व इतर रोगांचे प्रमाण बालमृत्यूचे प्रमाण सरासरी आयुर्मान इ.

६. शैक्षणिक निर्देशकः साक्षरतेचे प्रमाण, तंत्र कौशल्याचे शिक्षण व प्रौढ शिक्षण,

७. निवास निर्देश: लोकसंख्येतील बेघर लोकांचे प्रमाण, निवान्याचे स्वरूप इत्यादी.

८. मूलभूत सोयींचा निर्देशक पिण्याचे पाणी, दवाखाने, शाळा, बँकांची उपलब्धता इत्यादी.

९. सामाजिक निर्देशक: मुलामुलीचे लमाच्या वेळचे वय, जन्मदर, मृत्युदर, कुटुंब नियोजनाला प्रतिसाद, कुटुंबाचा सरासरी आकार इत्यादी.

या पद्धतीचा अवलंब करताना अडचण म्हणजे वस्तुनिष्ठ जीवन निर्देशक तयार करताना प्रत्येक घटकाला किती भार द्यावयाचा हा प्रश्न निर्माण होतो. व्यक्तिपरत्वे यामध्ये भिन्नता असल्याने संयुक्त राष्ट्रसंघाने दरडोई उत्पन्न हाच निकष महत्त्वाचा मानला आहे.

५) मानव विकास निर्देशांक:

आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक उपयुक्त ठरतो. सध्याच्या काळात आर्थिक विकासापेक्षा मानव विकासाकडे अधिक लक्ष दिले जात आहे. मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढविणे हे विकासाचे उद्दिष्ट असते, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मानवाचे आरोग्य व शिक्षण यावर

आवश्यक खर्च करावा लागतो. म्हणून मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्त्वाची असते. देशातील नागरिकांचे ज्ञान, कौशल्याचा विकास व त्यांचा पर्याप्त वापर करणे संबंधित देशाच्या आर्थिक विकसासाठी आवश्यक असते.

"मानव विकास निर्देशांक म्हणजे अपेक्षित आयुमर्यादा निर्देशक शैक्षणिक प्राप्ती निर्देशांक, राहणीमान निर्देशक आणि वास्तव दरडोई उत्पन्न निर्देशांक यांची सरासरी होय."

मानव विकास यावरून देशाच्या आर्थिक स्थितीची कल्पना येत असली तरी मानवी विकासाचे मापन करणे अतिशय कठीण आहे. मानवी विकास निर्देशांकाच्या सहाय्याने आर्थिक विकासाचा वेग लक्षात घेतला जातो. आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्ना बरोबरच मानवी विकास निर्देशांक उपयुक्त आहे.

मानव विकास निर्देशांकाची रचना :

१) सरासरी आयुर्मान : यामध्ये १०० वर्षे वयावर आयुर्मानाची अपेक्षा आणि बालमृत्यू दर या दोन निर्देशकाचा समावेश होतो.

२) साक्षरता प्रमाण यामध्ये सात वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तीची साक्षरता आणि औपचारिक शिक्षणाची समायोजित गहनता या परिणामांचा समावेश होतो.

३) दरडोई उत्पन्न : यामध्ये दरडोई दरमहा उपभोगा वरील खर्चाचा समावेश होतो.

राष्ट्रीय पातळीवर मानव विकास निर्देशांक काढताना प्रत्येक निर्देशकाचे महातम व न्यूनतम मूल्य निश्चित केले जाते. मानव विकास निर्देशांक चे मूल्य ० ते १ च्या

दरम्यान असते. या मूल्यानुसार राष्ट्र राष्ट्र मधील मानवी विकासाची तुलना करण्यासाठी क्रमवारी लावली जाते. ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक ०.९ ते १.० च्या दरम्यान आहे त्यांना अति उच्च मानव विकास निर्देशांक असलेले देश या गटात तर ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक ०.८ ते ०.९ च्या दरम्यान आहे त्यांना उच्च मानव विकास निर्देशांक असलेले देश या गटात समाविष्ट केले जाते. ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक ०.५ ते ०.८ च्या दरम्यान आहे त्यांना मध्यम मानव विकास निर्देशांक असलेले देश या गटात आणि ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक ०.५ पेक्षा कमी आहे त्यांना निम्न मानव विकास निर्देशांक असलेले देश या गटात समाविष्ट केले जाते, ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक अधिक आहे त्या देशाला विकसित देश, ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक तुलनेने कमी आहे त्यांना मध्यम विकसित आणि ज्यांचा मानव विकास निर्देशांक खूपच कमी आहे त्यांना अविकसित देश या गटात वर्गीकृत केले जाते.

६) जीवनमान निर्देशांक:

ओकन व रिचर्डसनच्या मते, आर्थिक विकासाच्या मापनासाठी केवळ राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यामध्ये • वाढ होणे पुरेसे नाही कारण लोकांच्या राहणीमानाचा स्तर प्रामुख्याने उपभोगाच्या स्तरावर अवलंबून असतो. अमेरिकेतील ओव्हरसीन डेव्हलपमेंट कौन्सिल या संस्थेने जीवनमानाच्या भौतिक गुणवत्ता निर्देशांक (POLI Physical Quality of Life Index) तयार केला, त्यासाठी सरासरी आयुर्मान, बालमृत्यूचे प्रमाण, साक्षरता वगैरे पटक विचारात घेतले.

प्रो. बी. एन. घोष यांनी १९९३ साली नवीन दृष्टीकोन मांडला. राष्ट्राची प्रगती पाहण्यासाठी जीवनाच्या मानवी गुणवत्तेचा निर्देशांक (Human Quality of Life Index - HQLI) विचारात घेतला आहे. साक्षरता, एकूण

लोकसंख्येशी प्रती व्यक्ती डॉक्टरांचे प्रमाण, आयुमर्यादा, बालमृत्यूप्रमाण, प्रति व्यक्ति प्रति दिन उष्मांक उपभोग प्रति दूरदर्शनच्या मागे लोकसंख्या, प्रति टेलिफोन मागे लोक घटक घेतले आहेत.

आर्थिक विकासाच्या मापनाच्या वरील सर्वच निर्देशक महत्त्वाचे व उपयुक्त असून ते परस्परांशी संबंधित व एकमेकांना पूरक आहेत. त्यामुळे कोणत्याही एका निर्देशकावर भर देऊन आर्थिक विकासाचे मापन करणे योग्य ठरणार नाही. आर्थिक विकासाची प्रक्रिया ही गुंतागुंतीची असल्याने एकूण परिस्थितीचा विचार करून वेगवेगळे निर्देशक वापरणे अधिक वास्तववादी व व्यावहारिक ठरेल.

१.२.२ विकसित आणि विकसनशील देशाची संकल्पना :

अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या स्थितीनुसार त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे विकसित, विकसनशील व अल्पविकसित अशा गटात वर्गीकरण करता येते. विकसीत किया विकसनशील अर्थव्यवस्थेची संकल्पना समजून घेण्यासाठी सुरुवातीला अर्थव्यवस्था म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल.

अर्थव्यवस्थेची व्याख्याः

१) प्रा. ग्रेगरी ग्रॉसमन :

"देशातील व्यक्ती, कुटूंबे, उद्योगसंस्था व्यवसाय संस्था यांच्या मार्फत उत्पादन, विभाजन, विनिमय आर्थिक क्रिया पार पाडल्या जातात. देशातील विविध घटक व संस्थांना वळण लावण्यासाठी ज्या यंत्रणेचा वापर केला जातो. तिला अर्थव्यवस्था असे म्हणतात

२) प्रा. लाऊकस:

"मानवी गरजा भागवितांना उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करण्यासाठी केलेले समग्र आर्थिक व्यवहार म्हणजे अर्थव्यवस्था होय."

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की अर्थव्यवस्थेत आर्थिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांचा, शासन व्यवस्थेचा नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास केला जातो.

अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण :

दरवर्षी जागतिक बँक प्रत्येक देशाच्या दरडोई उत्पन्नावरून अर्थव्यवस्थेची विभागणी तीन गटात करत असते. सन २०११ मध्ये जागतिक बँकेने अर्थव्यवस्थांची विभागणी खालील प्रमाणे केली होती.

अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण

| अर्थव्यवस्थेचा प्रकार | दरडोई उत्पन्न (USS) |
|---|---|
| कमी उत्पन्न अर्थव्यवस्था | १०२५ किंवा त्यापेक्षा कमी |
| मध्यम उत्पन्न अर्थव्यवस्था | १०२६ ते १२४७५ |
| उच्च उत्पन्न अर्थशास्त्र | १२४७६ पेक्षा जास्त |

सर्वसाधारणपणे ज्या देशाचे दरडोई उत्पन्न कमी आहे त्यांना अल्पविकसित अर्थव्यवस्था, ज्या देशांचे दरडोई उत्पन्न मध्यम स्वरूपाचे आहे त्या अर्थव्यवस्थांना विकसनशील अर्थव्यवस्था आणि ज्या देशांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला विकसित अर्थव्यवस्था असे म्हटले जाते. ज्या देशात गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता उत्पादनाचे जुने तंत्र, दरडोई उत्पन्न कमी, आर्थिक विषमता, प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त, शिक्षण, आरोग्य यासारख्या पायाभूत सुविधांचा अभाव अशा अर्थव्यवस्थेला

अल्पविकसित अर्थव्यवस्था म्हणतात. ज्या देशात विकास, प्रगती सुरू असते अशा अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था म्हणतात, तर अल्पविकसित अर्थव्यवस्थेच्या विरुद्ध परिस्थिती विकसित अर्थव्यवस्थेत असते.

विकसित देशाची संकल्पना :

ज्या देशाच्या अर्थव्यवस्थेत दरडोई उत्पन्न अधिक असते, देशातील स्थूल कौटुंबिक उत्पन्नाचा स्तर उच्च असतो, तो तांत्रिक व पायाभूत सुविधांचा विकास झालेला असतो. देशातील नागरिकांचे राहणीमान व जीवनमान उंचावलेले असते, तसेच गरिबीचे प्रमाण व बेरोजगारीचे प्रमाण अत्यंत कमी असते आणि देशातील लोकांच्या सर्व गरजा पूर्ण करण्याची क्षमता अर्थव्यवस्थेमध्ये असते, अशा देशांना विकसित अर्थव्यवस्थता असे म्हणतात. अमेरिका, ब्रिटन, जपान, जर्मनी, कॅनडा, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया, इटली, नार्वे व स्वीडन इत्यादी विकसित अर्थव्यवस्था आहेत. विकसित देशाचा अर्थ लक्षात घेण्यासाठी पुढील व्याख्या उपयोगी ठरतील.

१) ज्या देशात लोकसंख्या व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या तुलनेत भांडवल निर्मिती व तंत्रज्ञानाचा वेग अधिक असतो त्यास विकसित देश असे म्हणतात.

२) ज्या देशात राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा वेग लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक असतो, देशातील बेरोजगारी व दारिद्र्याचे प्रमाण अत्यल्प आहे आणि लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उच्च असतो त्यास विकसित देश असे म्हणतात.

३) जागतिक स्तरावर ज्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न इतर अविकसित व विकसनशील देशा अधिक असते ते त्यास विकसित देश असे म्हणतात.

विकसनशील देशाची संकल्पना :

ज्या अर्थव्यवस्थेमध्ये विकसित अर्थव्यवस्थेच्या तुलनेत दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण कमी असते आणि जी अर्थव्यवस्था आपल्या समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असते त्या अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात उदाहरणार्थ भारत, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका या विकसनशील अर्थव्यवस्था आहेत. विकसनशील अर्थव्यवस्थेची व्याख्या काही अर्थशास्त्रज्ञांनी पुढीलप्रमाणे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) जेकब वायनर :

"विशिष्ट वेळी असणाऱ्या लोकसंख्येला अधिक चांगले सहजीवन मिळवून देण्याच्या दृष्टीने, अगर अधिक लोकसंख्या असताना राहणीमान घसरुन देता या लोकसंख्येचे पालन करण्यासाठी अधिक भांडवल अधिक साधन सामग्री, अधिक श्रम इत्यादी मिळविण्याची सुप्त शक्ती असणारी अर्थव्यवस्था म्हणजे विकसनशील अर्थव्यवस्था होय."

२) रॅग्नर नर्क्स:

"विकसित अगर प्रगत अर्थव्यवस्थेशी तुलना करता ज्या अर्थव्यवस्था मध्ये लोकसंख्या आणि नैसर्गिक साधनसामग्री ह्यांच्या मानाने भांडवलाची कमतरता असते त्या अर्थव्यवस्थेस विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात."

३) युजीन स्टॅले

"ज्या अर्थव्यवस्थेत नैसर्गिक साधनसंपतीचा तुटवडा नसतो तर ती पुरेसा प्रमाणात उपलब्ध असून देखील जुनाट पध्दती व दोषपूर्ण सामाजिक रचनेमुळे, व्यापक

प्रमाणावर दारिद्रय अस्तित्वात असते. अशा अर्थव्यवस्थता विकसनशील अर्थव्यवस्था म्हणता येईल."

४) संयुक्त राष्ट्र संघ :

“ज्या देशांचे वास्तविक दरडोई उत्पन्न अमेरिका या प्रगत राष्ट्रांच्या दरडोई उत्पन्नाच्या एक चतुर्थांशपेक्षा कमी असेल ते विकसनशील किंवा अर्ध-विकसित देश होत.”

विकसित आणि विकसनशील देशातील फरक:

विकसित आणि विकसनशील देशातील फरक पुढील मुद्दाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. विकसित देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न हे विकसनशील देशांपेक्षा अधिक असते,

२. विकसित देशात भांडवल निर्मितीचा दर अधिक असतो विकसनशील देशात तो कमी असतो.

३. विकसित देशात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो तर विकसनशील देशात तांत्रिक प्रगती फारशी झालेली नसते.

४. विकसित देशातील लोकांचे राहणीमान व एकंदरीत जीवनमान उच्च दर्जाचे असते याउलट विकसनशील देशातील लोकांचे राहणीमान व जीवनमान निम्न दर्जाचे असते.

५. विकसित देशात विकसनशील देशांच्या तुलनेत रोजगार निर्मितीचा दर अधिक असतो त्यामुळे विकसित देशात बेरोजगारीचे प्रमाण कमी तर विकसनशील देशात हे प्रमाण अधिक असते.

६. विकसित देशात रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होत असल्याने दारिद्र्याचे प्रमाण कमी असते याउलट विकसनशील देशात रोजगार निर्मितीच्या अभावी दारिद्रयाचे प्रमाण अधिक असते.

७. विकसित देशात आधारभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला असतो पाउलट विकसनशील देशात पायाभूत सुविधांचा परसा विकास झालेला नसतो.

८. विकसित देशात उच्च दर्जाचे तत्रज्ञान मोठ्या प्रमाणात भांडवलाची उपलब्धता व कुशल श्रमिक यामुळे संसाधनाचा पर्यात वापर केला जातो याउलट विकसनशील देशात याबाबतीत प्रतिकूल परिस्थिती असल्याने संसाधनाचा पर्याय वापर केला जात नाही.

९. विकसित देशात दारिद्र्याचे प्रमाण कमी असल्याने आर्थिक विषमता कमी असते याउलट विकसनशील देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

१०. विकसित देशात रोजगार निर्मितीमध्ये सेवा क्षेत्राचे योगदान अधिक असते विकसनशील देशात कृषी व लघुउद्योगाचे रोजगार क्षेत्रातील योगदान अधिक असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे आपणास विकसित व विकसनशील देशातील यातील फरक स्पष्ट करता येतो.

विकसित देशाची वैशिष्ट्ये:

राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, सुधारित व प्रगत तंत्रज्ञान हो विकसित अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. विकसित देशाच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन, औद्योगीकरण, लोकांचे जीवनमान, तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा यासारख्या आर्थिक पटकाबरोबरच मानव विकास निर्देशांक, शिक्षण, आरोग्य आणि साक्षरतेचे प्रमाण यांचा उपयोग केला जातो.

विकसित देशामध्ये स्थिर सरकार, चांगले प्रशासन, भाडवल निर्मितीच्या दर अधिक, उच्च राहणीमान याबरोबरच आर्थिक स्थैर्य, महागाईचा अनुकूलन हे लोकांच्या या आर्थिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेले घटक अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येतात. थोडक्यात विकसित अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरपणे व सतत आर्थिक विकास होत असतो. या विकसित अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) मानवी भांडवलाचा विकास

मानवी भांडवल म्हणजे मानवाच्या अंगी असलेले बौद्धिक, मानसीक, शारिरीक कौशल्य होय. या कौशल्यांचा केलेला विकास म्हणजेच मानवी भांडवलाचा विकास होय. एखाद्या देशाच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी या निर्देशांकाचा उपयोग केला जातो. मानव विकास निर्देशांकामध्ये मूलभूत गरजांची पूर्तता, आरोग्य, शिक्षण आणि तंत्रज्ञान, रोजगार व भौतिक सुविधा या घटकांच्या आधारे मोजमाप केले जाते. मानव विकास निर्देशांकाची मूल्य शून्य ते एक या दरम्यान असते, हे मूल्य शून्य पेक्षा जेवढे जास्त विकास अधिक असे समजले जाते. विकसित देशामध्ये भौतिक भांडवल या प्रमाणे मानवी भांडवल मुद्धा उच्च गुणवतेचे असते. कारण शिक्षण, प्रशिक्षण यासंबंधीच्या सेवा सुविधा लोकांना भरपूर प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे लोकांचे राहणीमान आरोग्य गतीक्षमता वाढून आर्थिक विकासाला हातभार लागतो.

२) दरडोई उत्पन्न अधिक :

दरडोई उत्पन्न म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न होय. देशातील एकूण उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते. विकसित राष्ट्राचा विकास पूर्णपणे झालेला असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त असते. प्रगत तंत्रज्ञान व भांडवल निर्मितीचा दर अधिक असल्यामुळे उत्पन्नाची साधने व

रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात. परिणामी दरडोई उत्पन्नही अधिक असते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०१५ मध्ये अमेरिका, जपान, जर्मनी या विकसित देशांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ५५२००, ४२००० व ४७६४० डॉलर होते, तर भारतासारख्या विकसनशील देशाचे दरडोई उत्पन्न १५७० (डॉलर) होते. यावरून स्पष्ट होते की विकसनशील देशापेक्षा विकसित देशाचे दरडोई उत्पन्न अधिक असते.

३) औद्योगीकरणाचे अधिक प्रमाण:

अर्थव्यवस्था जसजशी प्रगत होत जाते तसतसे तिचे प्राथमिक क्षेत्र वरील अवलंबित्व कमी होऊन दुय्यम व तृतीय क्षेत्राचे महत्व वाढत जाते. वस्तू निर्माण व सेवा क्षेत्राचे प्रमाण अधिक असल्यामुळे तंत्रज्ञान व पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होऊन देशातील लोकांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच उत्कृष्ट सोयी सुविधा प्राप्त होतात.

विकसित देशातील औद्योगीकरण व सेवा क्षेत्राच्या विकासामुळे त्यांची आयातीपेक्षा निर्यात अधिक असते त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातुन त्यांना अधिक फायदा प्राप्त होतो. थोडक्यात, अल्प विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेत विकसित देशात औद्योगिकरण व सेवा क्षेत्राचा विकास अधिक झालेला असतो.

(४) राजकीय स्थिरता :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी राजकीय स्थैर्य असणे अत्यंत आवश्यक असते. जागतिक बँकेने आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी राजकीय स्थैर्य हा मापदंड उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. विकसित देश राजकीय दृष्ट्या स्थिर

असल्याने तेथे भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी असते तसेच शासन व प्रशासन अधिक चांगल्या पद्धतीने कार्यरत असते.

जागतिक शासन निर्देशांकाचे मूल्य २.५ ते २.५ या दरम्यान असते. २.५ हे पूर्ण राजकीय स्थिरता तर २.५ + हे पूर्ण राजकीय अस्थिरता दर्शविते. जागतिक शासन निर्देशांकाचे मूल्य जेवढे अधिक असेल तेवढी त्या देशात राजकीय स्थिरता आहे असे समजले जाते.

५) देशातील नागरिकांचे स्वातंत्र्य व हक्क :

'विकसनशील देशांच्या तुलनेत विकसित देशातील नागरिकांना अनेक प्रकारचे स्वातंत्र प्राप्त होत असते. विकसित देशात नागरिकांना प्राप्त होणाऱ्या विविध स्वातंत्र्याचा दर्जा हा हा मूलभूत अधिकारासारखाच असतो. यामध्ये देशात कुठेही स्थानिक होण्याचा, जमीन किंवा मालमत्तेची मालकी मिळवण्याचा सरकारच्या धोरणासंबंधी माहिती मिळविण्याचा अधिकार यांचा समावेश होतो. विकसनशील किंवा अल्प विकसित देशांमध्ये लोकांना अनेक प्रकारच्या मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवले जाते, याचा परिणाम देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर होताना दिसून येतो.

(६) उच्च दर्जाचे राहणीमान :

विकसनशील देशाच्या तुलनेत विकसित देशांतील लोकांचे राहणीमान उच्च दर्जाचे असते. विकसित देशात प्रगत तंत्रज्ञानामुळे कमीत कमी खर्चात दर्जेदार वस्तूचे उत्पादन होते तसेच संसाधनाचा पर्याप्त वापर होत असल्याने कमीत कमी खर्चात वस्तू उपलब्ध होते. परिणामी लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. दुसऱ्या बाजूने लोकांची क्रयशक्ती अधिक असल्याने ते आरोग्य शिक्षण स्वच्छता यांच्याशी संबंधित दर्जेदार वस्तू व सेवा खरेदी करू शकतात.

७) सकल देशांतर्गत उत्पादन अधिक

सकल देशांतर्गत उत्पादन आर्थिक विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे. विकसनशील व अविकसित देशांच्या तुलनेत विकसित देशाचे सफल देशांतर्गत उत्पादन अधिक असते. सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजे एका आर्थिक वर्षाच्या कालखंडात देशात उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे अंतिम मूल्य होय, लोकसंख्येचे प्रमाण स्थिर असताना क्या देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात वाढ होत असते तो देश विकसित समजता जातो. सकल देशांतर्गत उत्पादनाबरोबरच लोकसंख्येत वाढ होत असेल तर दरडोई उत्पन्नात वाढ होत नसल्याने आर्थिक विकासाला गती मिळत नाही.

८) शिक्षणाचा उच्च दर्जा :

अल्प विकसित व विकसनशील देशात लोकसंख्येचे अधिक प्रमाण दारिद्र्य, बेरोजगारी यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावलेला असतो. विकसित देशात दारिद्र्य बेरोजगारी याबरोबरच लोकसंख्येचे प्रमाणही कमी असते यामुळे तेथील लोकांना उच्च दर्जाचे शिक्षण देणे शक्य होते. विकसित देश आपल्या देशातील सर्व मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा उत्तम असावा यासाठी कटाक्षाने लक्ष देऊ शकतात. यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या तुलनेत विकसित राष्ट्रामध्ये लोकांची गुणवत्ता चांगली असते. परिणामी या देशातील मनुष्यबळाचा विकास अधिक बागल्या प्रकारे झालेला दिसून येतो.

(९) ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था :

प्रक्रिया डिझाईन सॉफ्टवेअर आणि फॉर्मुलेशन यासारखे ज्ञान देशात विकसित करणे म्हणजेच ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था होय. ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था त्यामुळे लोकांच्या सर्जनशीलते मध्ये वाढ होते आणि देशाच्या वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीला गती मिळते. (ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेमुळे विकसित देशातील अर्थव्यवस्थेमध्ये

वकील, डॉक्टर, अभियंते, आर्किटेक्ट यासारख्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण अधिक असते.

१०) अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्व अधिक:

विकासाबरोबरच अर्थव्यवस्था प्राथमिक क्षेत्राकडून दुय्यम क्षेत्राकडे आणि दुय्यम क्षेत्राकडून तृतीय क्षेत्राकडे स्थलांतरित होत असते, क्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व अधिक असते त्या देशाला विकसित देश असे म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील दळणवळण वाहतूक रेस्टारंट सॉफ्टवेअर व इतर व्यावसायिक सेवा यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असते. अल्प विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेत विकसित देशाच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व अधिक असल्याचे दिसून येते.

११) शासनाची भूमिका:

विकसनशील अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्था यामध्ये शासनाची भूमिका भिन्नभिन्न असलेली दिसून येते. विकसित अर्थव्यवस्थेत लोकांच्या मूलभूत गरजा अगोदरच पूर्ण झाल्या असल्याने शासनाला त्या गरजा पूर्ण करण्याकडे फार लक्ष द्यावे लागत नाही. विकसित अर्थव्यवस्थेत राजकीय स्थिरता असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था आणि सुयोग्य प्रशासन शासन सहजपणे उपलब्ध करून देऊ शकते. याबरोबरच आरोग्य, शिक्षण, वाहतूक व नवप्रवर्तन यासारख्या सुविधा विकसित अर्थव्यवस्थेत सहजपणे उपलब्ध होतात.

१२) आरोग्य सुविधांची उपलब्धता :

अल्प विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेत विकसित देशात उत्तम दर्जाच्या व कार्यक्षम आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध होत असतात. याचा परिणाम म्हणून मृत्युदर व बालमृत्यू दराचे प्रमाण खूपच कमी असते. थोडक्यात देशांमध्ये

अत्याधुनिक स्वरूपाच्या आरोग्य सुविधा लोकांना उपलब्ध होत असल्याने त्यांच्या जीवनमानात सुधारणा झालेली दिसून येते.

(१३) प्रजनन दराचे कमी प्रमाण :

एक स्त्री आपल्या प्रजननक्षम काळात किती अपत्यांना जन्म देऊ शकते हे प्रमाण म्हणजेच प्रजनन दर होय. अल्प विकसित व विकसनशील देशात संयुक्त कुटुंब पद्धतीच्या प्रभावामुळे प्रजनन दर अधिक असतो. याउलट अविकसित देशात विभक्त कुटुंब पद्धतीच्या प्रभावामुळे प्रजनन दर कमी असतो, याचा परिणाम म्हणून विकसित देशात लोकसंख्या वाढीचा दर कमी असतो.

विकसित देशातील लोकांना आर्थिक व राजकीय स्थैर्य व उच्च दर्जाचे जीवनमान प्राप्त होत असते. या अनुषंगाने त्यांना शिक्षण आरोग्य व मानव विकासाशी संबंधित सोयीसुविधा सहजपणे उपलब्ध होत असतात. आर्थिक विकासाचे जे विविध निर्देशक आहेत त्यांची स्थिती विकसित देशात विकसनशील देशांच्या तुलनेत अधिक चांगली असल्याचे दिसून येते.

विकसनशील देशाचे वैशिष्ट्येः

विकसनशील अर्थव्यवस्था ही अल्पविकसित अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्था या दोन्हीच्या मधली 'अवस्था असते. या अर्थव्यवस्थेत उद्योग, सेवा, कृषी, पायाभूत सुविधा याचा विकास होत असतो. तसेच गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, आर्थिक विषमता कमी झालेली असते. वरील सर्व वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्थेत दिसून येतात. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था समजले जाते. विकसनशील अर्थव्यवस्थेची खालील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१) दरडोई उत्पन्न कमी

दरडोई उत्पन्न म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न होय. देशातील एकूण उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते. विकसनशील राष्ट्राचा विकास पूर्णपणे झालेला नसल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असते. उत्पन्नाची साधने व रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतात. परिणामी दरडोई उत्पन्नही कमी असते, जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०१५ मध्ये भारतातील दरडोई उत्पन्न १५७० (डॉलर) होते. तर अमेरिका, जपान, जर्मनी या देशांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ५५२०० ४२००० व ४७६४० डॉलर होते. यावरून स्पष्ट होते की विकसनशील अर्थव्यवस्थेचे दरडोई उत्पन्न कमी असते.

२) राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे अधिक महत्व :

अर्थव्यवस्थेत प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्र असतात. प्राथमिक क्षेत्रात नैसर्गिक संसाधनावर अवलंबून असणाच्या कृषी व कृषी संबंधित उद्योगांचा समावेश होतो. परंतु यात कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते. द्वितीय क्षेत्रात उद्योगधंदे व बांधकाम तर तृतीयक क्षेत्रात व्यापार, वाहतूक, दळणवळण, साठवणूक, बैंकिंग, विमा यासारख्या सेवांचा समावेश होतो. विकसनशील अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे म्हणजेच कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नात रोजगार निर्मितीत प्रमुख स्थान असते. भारतात स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ६०% पेक्षा जास्त होता. नंतर तो कमी झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये हा वाटा १५ टक्क्यांपेक्षा कमी झाला असला तरी देशातील एकूण रोजगारांपैकी ५२ टक्क्यांपेक्षा अधिक रोजगार कृषी क्षेत्रात उपलब्ध होतो. त्यामुळे कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जाते.

३) बेरोजगारी व दारिद्र्याचे अधिक प्रमाण:

बेरोजगारी व दारिद्र्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशात मोसमी पावसावर शेतीचे अस्तित्व, उद्योगांचा कमी विकास, रोजगाराची कमतरता. भांडवलप्रधान

तंत्राचा वापर व लोकसंख्या वाढीचा वेग जास्त या सर्वांमुळे बेरोजगारीचा दर जास्त असतो. त्यामुळे छुपी (प्रामुख्याने शेती क्षेत्रात), ग्रामीण, शहरी, सुशिक्षितांच्या बेरोजगारीचे अस्तित्व जास्त असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात घट होते. दारिद्र्यात वाढ होते. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये दारिद्र्य आणि बेरोजगारी या दोन महत्त्वाच्या समस्या असल्याचे दिसून येते.

४) भांडवलाची कमी:

आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी भांडवलाची मुबलक उपलब्धता आवश्यक असते. देशात दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे बचत कमी होते. परिणामी भांडवल निर्मितीही कमी होते. बँका व वित्तीय संस्थांची कमतरता, योग्य तारणाचा अभाव यामुळे शेती, उद्योग व सेवा क्षेत्रासाठी योग्य वेळी, पुरेशा प्रमाणात व कमी व्याजदरात भांडवल उपलब्ध होत नाही व उत्पादनात वाढ, आधुनिक तंत्राचा वापर करणे शक्य होत नाही. विकसनशील व्यवस्थेला भांडवलाच्या कमतरतेमुळे आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यात अडचणी येत असतात.

५) नैसर्गिक संसाधनांचा अपुरा वापर

नैसर्गिक संसाधने म्हणजे निसर्गतः मानवाला मिळालेली विनामूल्य देणगी होय. या नैसर्गिक संसाधनात भूमी, पाणी खनिजे बने सूर्यप्रकाश, बापू, सागरी किनारा, मानवी श्रम व पशु धन या सर्वांचा समावेश होतो. विकसनशील देशात नैसर्गिक संसाधनावरील अवलंबित्व अधिक असते परंतु तू त्यांचा पर्यामवापर होताना दिसून येत नाही. भांडवलाची कमतरता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, मागासलेपणा, संशोधनाचा अभाव यामुळे या नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर होत नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेकडे नैसर्गिक साधन सामग्री मोठ्या प्रमाणात उपलब्ध असूनही त्यांच्या पर्याप्त वापर न केल्यामुळे त्या विकासाचा अपेक्षित येग गाठू शकत नाहीत,

६) सुप्त बेरोजगारीचे प्रमाण अधिक:

शेती क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा अधिक श्रमिक काम करीत असल्याने तेथे सुम बेरोजगारी निर्माण होते. असे अतिरिक्त श्रमिक उत्पादन प्रक्रियेत सहभागी होतात परंतु त्यांच्या सहभागामुळे उत्पादनात कोणतीच भर पडत नाही. थोडक्यात अशा श्रमिकांना कामावरून काढले तरी उत्पादनावर त्याचा कोणताही परिणाम होत नाही. अशा श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते. भारतात कृषी क्षेत्रात सुम बेरोजगारीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

७) कृषी क्षेत्राचे निसर्गावरील अवलंबित्व अधिक:

विकसनशील देशातील कृषी क्षेत्राला जलसिंचनाच्या सुविधा फारशा उपलब्ध झालेल्या नसतात, परिणामी कृषी क्षेत्र निसर्गावर अवलंबून असते. परिणामी निसर्गाला अनुकूल अशी पीक रचना असते. निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे कृषी क्षेत्रातील उत्पादनाची शाश्वती देता येत नाही.

१८) लोकसंख्या वाढीचा वेग जास्त :

विकसनशील अर्थव्यवस्थेत जन्मदर व मृत्युदराचे अधिक प्रमाण, लोकसंख्या नियंत्रणाकडे दुर्लक्ष, गरिबी, अज्ञान, वाईट प्रथा व चालीरीती या सर्वांचा परिणाम देशातील लोकसंख्येत वेगाने वाढ होते. १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. सन २०११ च्या जनगणनेनुसार ती १२१.०२ कोटी झाली आहे. विकसनशील देशाच्या तुलनेत विकसित देशात लोकसंख्या वाढीचा दर कमी असतो.

९) सरासरी आयुर्मान:

मनुष्य जन्माला आल्यानंतर तो सरासरी किती वर्षे अरे जगू शकेल याला सरासरी आयुर्मान असे म्हणतात. विकसित देशातील लोकांचे सरासरी आयुर्मान अधिक तर विकसनशील देशातील लोकांचे सरासरी आयुर्मान कमी असते. उपलब्ध असणाऱ्या वैद्यकीय सुविधा हा सरासरी आयुर्मान ठरविणारा महत्त्वाचा घटक असतो. बतीत देशात आरोग्याच्या कमतरतेमुळे सरासरी आयुर्मान विकसित देशाच्या कमी

असल्याचे दिसून येते, दिसून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान ६६.१ वर्ष होते.

१०) जन्मदर व मृत्युदराचे प्रमाण अधिक:

प्रति वर्षी दर हजार लोकांमागे जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजेच जन्मदर होय. तर मृत्युदर म्हणजे प्रतिवर्षी दर हजार लोकांमागे मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांचे प्रमाण होय. विकसित देशाच्या तुलनेत विकसनशील देशांकडे असणाऱ्या अपुऱ्या वैद्यकीय सुविधेमुळे विकसनशील देशात जन्मदर व मृत्युदराचे प्रमाण विकसित देशांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

११) बालमृत्यू दराचे प्रमाण अधिक :

जन्माला येणाऱ्या दर हजार बालकांमधील मृत्युमुखी पडणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजेच बाल बालमृत्यूदर होय. विकसनशील देशात गरोदर मातांना प्रसूतीच्या वेळी मिळणाऱ्या या अपुऱ्या वैद्यकीय सुविधेमुळे बालमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील बालमृत्युचे प्रमाण प्रति १००० बालकामागे ४४ एवढे होते.

१२) भांडवल- उत्पादन प्रमाण कमी:

उत्पादनाच्या एका मात्रे साठी लागणाऱ्या भांडवलाच्या मात्रा म्हणजेच भांडवल उत्पादन प्रमाण होय. विकसित देशांत प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे भांडवल उत्पादन प्रमाण अधिक असते याउलट विकसनशील देशात अप्रगत तंत्रज्ञानामुळे भांडण उत्पादन प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. कोणत्याही देशाला जलद आर्थिक विकासासाठी आपल्या तांत्रिक पातळीत सुधारणा करून भांडवल उत्पादन प्रमाणामध्ये वाढ करणे आवश्यक असते.

१३) तंत्रज्ञानाचा निकृष्ट दर्जा:

देशातील उत्पादन पारंपरिक पद्धतीने घेतले जाते. भांडवलाची कमतरता यंत्रसामुग्रीचा अभाव, संशोधनाकडे दुर्लक्ष, पारंपरिक दृष्टिकोन या सर्व कारणांमुळे उत्पादन व उत्पादकता कमी होते. तसेच उत्पादन निकृष्ठ दर्जाचे होते. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यापासून उद्योग व सेवा क्षेत्रातील तंत्रज्ञानात बदल होत आहेत, परंतु कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानात आजही खूप मोठे बदल करणे आवश्यक आहे. विकसनशील अर्थव्यवस्था भांडवलाच्या कमतरतेमुळे तंत्रज्ञानाच्या विकासात आघाडी घेऊ शकत नाही.

१४) श्रमिकांची गतिशीलता :

एखादा श्रमिक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी काम करण्यासाठी स्थलांतर करण्यास कितपत तयार आहे याला श्रमिकाची गतिशिलता असे म्हणतात. विकसित देशात पायाभूत व वाहतुकीच्या सुविधा यामुळे श्रमिकांची गतिशीलता अधिक असते तर विकसनशील देशांमध्ये या सुविधांचा फारसा विकास झालेला नसतो तसेच इतर सामाजिक कारणामुळे श्रमिक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी फारसे इच्छुक नसतात यामुळे विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशातील श्रमिकांची गतिशीलता कमी असते.

१५) श्रमिकांची कार्यक्षमता :

प्रगत तंत्रज्ञानाबरोबरच श्रमिका साठी उपलब्ध असलेल्या शिक्षण व प्रशिक्षणाच्या सोयी सुविधेमुळे श्रमिकांची कार्यक्षमता वाढते. विकसित देशात प्रगत तंत्रज्ञानाचा वापर व श्रमविभागणी यामुळे श्रमिकांची कार्यक्षमता विकसनशील देशांच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येते.

१६) परंपरावादी सामाजिक दृष्टिकोन :

देशात वाईट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा, निरक्षरता दैववादी दृष्टिकोन यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे अर्थव्यवस्थेवर त्याचा वाईट परिणाम होतो. तसेच प्रामुख्याने गरीब वर्गात सण, उत्सव, विवाह, धार्मिक क्रिया या अनुत्पादक घटकांवर एकूण उत्पन्नातील खूप मोठा वाटा खर्च केला जातो. त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात वाढ होते. विकसनशील अर्थव्यवस्थेतील लोक शिक्षणाच्या कमतरतेमुळे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकल्याचे दिसून येते.

१७) आर्थिक विषमतेचे अधिक प्रमाण :

देशात संपती उत्पन्न व उत्पादन घटकांचे विभाजन विषम झाले आहे. ग्रामीण शहरी आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. आर्थिक विषमता म्हणजे मर्यादित श्रीमंत व्यक्तीकडे खूप जास्त संपत्ती असणे व लोकसंख्येने जास्त असलेल्या गरीब वर्गाकडे संपत्ती कमी असणे देशात प्रार भागापेक्षा शहरी भागात आर्थिक विषमतेचे प्रमाण जास्त आहे. विकसनशील अर्थव्यता कमी करणे आणि उत्पन्नाचे समन्यायी वाटप करणे हे महत्वाचे आव्हान असते.

१८) राजकीय अस्थिरता

विकसनशील देशात दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता याबरोबरच प्रगत देशन, निरक्षरता यासा कारणामुळे विकसित देशाच्या तुलनेत राजकीय अधिक असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे विकसनशील अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये करता येतील

१.२.३ उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थ व्यवस्थेची वैशिष्ट्ये :

उदयोन्मुख किंवा उभरती अर्थव्यवस्था म्हणजे नव्याने भरभराटीस येणारी किंवा नव्याने प्रगतीपथावर येणारी अर्थव्यवस्था होय. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था मागासलेली होती दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, प्राथमिक क्षेत्रावरील अधिक अवलंबित्व यासारख्या समस्या अर्थव्यवस्थेसमोर होत्या,

अर्थव्यवस्थेसमोरील या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि जलद आर्थिक विकास हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला गेला.

भारतीय अर्थव्यवस्थेची बेगाने प्रगती होण्यासाठी १९९१ पासून देशात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविला जात आहे. उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास साध्य करण्यावर नवीन आर्थिक धोरणात भर दिलेला आहे. सध्याच्या काळात वेगाने आर्थिक विकास साध्य करणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था ओळखली जाते. जागतिक स्तरावर भारत व चीन या दोन अर्थव्यवस्था उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत आहेत. उदयोन्मुख अर्थव्यवस्थेच्या काही प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे करता येतील.

उदयोन्मुख अर्थव्यवस्थेच्या व्याख्या :

१) "सद्य:स्थितीत वेगाने आर्थिक वृद्धिदर साध्य करणाऱ्या अर्थव्यवस्था म्हणजे उदयोन्मुख अर्थव्यवस्था होईल."

२) "अद्भुतपणे आणि आश्चर्यकारकरीत्या आर्थिक वृद्धीचा दर अनुभवणाऱ्या अर्थव्यवस्था म्हणजे उदयोन्मुख अर्थव्यवस्था होय."

३) "वेगवान आर्थिक वृद्धी आणि औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने प्रगतिपथावर वाटचाल करणाऱ्या पुढारलेल्या अर्थव्यवस्था म्हणजे उदयोन्मुख अर्थव्यवस्था होय."

वरील व्याख्येवरून उदयोन्मुख अर्थव्यवस्थेची पुढील लक्षणे सांगता येतील.

१. देशातिल आणि विदेशी गुंतवणुकीमध्ये वेगाने वाढ होत असते,

२. पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये गती आलेली असते.

३. नवीन तंत्र उपलब्ध करून घेऊन त्याचा प्रत्यक्ष उत्पादन व्यवस्थेत उपयोगास सुरुवात झालेली असते.

४. शेती व्यवसायामधील पारंपरिक दृष्टिकोन जाऊन त्या ठिकाणी व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण झालेला असतो.

५. व्यापारी दृष्टिकोनातून पीक रचना अस्तित्वात येऊ लागते.

६. लोकांच्या बचतपातळीत वाढ होऊन गुंतवणुकीसाठी लागणारा निधी अंतर्गत बचतीमधून निर्माण होऊ लागतो.

७. वाहतूक व संदेशवहनाच्या साधनांमध्ये सुधारणा झालेली असते.

८. भांडवलबाजार व नाणेबाजार यांच्यामध्ये लक्षणीय बदल होऊ लागतात.

९. सामान्य लोक आपला निधी भांडवलबाजारात गुंतवणुकीसाठी उपलब्ध करण्यास तयार होऊ लागतात.

म्हणतात.

वरील सर्व वैशिष्ट्ये ज्या अर्थव्यवस्थेत दिसून येतात त्या अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात.

उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये:

राजकीयदृष्ट्या जागतिक पातळीवरील राजकारणात ज्या अर्थव्यवस्थांना महत्व प्राप्त होत आहे आणि ज्या अर्थव्यवस्थांची जागतिक स्तरावर भूमिका विस्तारत आहे त्या अर्थव्यवस्था उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेले देश हे अमेरिका, कॅनडा, जपान, जर्मनी या देशाइतके श्रीमत नाहीत; परंतु या देशांमध्ये बाजारातील बदल, तंत्रज्ञान, व्यावसायिक संस्कृती आणि सामाजिक कार्यपद्धतीचा बदलामुळे या देशांची वेगाने

आर्थिक वृद्धी होत आहे. विकसित देशांच्या आर्थिक वृद्धिदराच्या तुलनेत भारताचा आर्थिक वृद्धिदर जास्त आहे. जागतिक सरासरीपेक्षा आर्थिक वृद्धिदर जास्त आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) गतिमान आर्थिक वृद्ध:

भारताच्या आर्थिक विकासाचा वृद्धिदर गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने व वेगाने वाढत आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्थेचे हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य समजले जार वास्तविकत: भारताच्या देशांतर्गत (उत्पादनवाढीचा वेग इतर देशांच्या तुलनेने अधिक आहे. विविध अर्थतज्ज्ञांच्या मते, जेव्हा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाचा आर्थिक वृद्धिदर सातत्याने तीन टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असतो तेव्हा अर्थव्यवस्थेस 'उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाचा वार्षिक वृद्धिदर सरासरीने पाच टक्क्यांहून अधिक राहिलेला आहे. असे असले तरी भारत हा विकसित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशाचे अनेक निकष पूर्ण करत नाही. यामुळे पूर्णतः विकसित अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था ओळखली जात नाही. विकासाच्या मार्गावर अग्रेसर आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख आहे.

२) अस्थिरतेचे प्रमाण अधिक :

उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेवे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या अर्थव्यवस्थेमध्ये अधिक अस्थिरता असते. अर्थव्यवस्थेत अनेक नवनवीन बदल करण्याची प्रवृत्ती असल्याने कृषी, उद्योग व सेवा अशा विविध क्षेत्रामध्ये सातत्याने अस्थिरतेचे वातावरण असते. नवीन तंत्रे, उत्पादन पद्धती यांचा स्वीकार केला जातो. त्यामुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होत असते. नैसर्गिक

आपत्ती अथवा देशांतर्गत धोरण यांसारखे इतर घटकदेखील या अस्थिरतेला कारणीभूत असतात.

उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा शेतीवरदेखील अधिक भर असतो. नैसर्गिक आपत्तीच्या काळात या देशांना अधिक (असुरक्षितता जाणवत असते. परंतु उदयोन्मुख अर्थव्यवस्था त्याच्या आर्थिक संरचनेला तोंड देण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. यास भारतीय अर्थव्यवस्थादेखील अपवाद नाही, उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना व्यापक आर्थिक जोखिमी आणि चलनाच्या बाह्य मूल्यातील घट यांचादेखील सामना करावा लागतो. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण बदल पाहून येतात.

३) दरडोई उत्पन्नातील वाढीची प्रवृत्ती:

वाढते दरडोई उत्पन्न हा उदयोन्मुख अर्थव्यवस्था ठरविणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. दरडोई उत्पन्न म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नास एकूण लोकसंख्येने मागले असता मिळणारे उत्पन्न होय. देशातील लोकसंख्येच्या जीवनमानाचा दर्जा निश्चित करण्यासाठी 'दरडोई उत्पन्न या निकषाचा उपयोग केला जातो. उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून इतर विकसित देशांच्या तुलनेने भारताचे दरडोई उत्पन्न इतर देशांच्या तुलनेने कमी असले तरी त्यामध्ये वाढण्याची प्रवृत्ती असल्याचे दिसून येते.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०१९-२० मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न १.४८८.५१ डॉलर्स होते; तर अमेरिका व जपान या देशांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ४,८७.११२ आणि ४५,९०३ डॉलर्स होते. भारताच्या दरडोई उत्पन्नाची गणना कमी मध्यम उत्पन्न गटामध्ये केली जाते. याचा अर्थ, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये उच्च दरडोई उत्पन्नाची पातळी गाठण्याची क्षमता आहे.

४) राहणीमानाच्या दर्जात सुधारणा :

राहणीमानाच्या उच्च दर्जामध्ये होत असलेली सुधारणा हे उदयोन्मुख अर्थव्यवस्थेचे एक वैशिष्टय समजले जाते. राहणीमानाचा दर्जा, साक्षरता, सरासरी आयुर्मान, जन्मदर व मृत्युदर यावरून गणना केली जाते. भारतातिल लोकांचे सरासरी आयुर्मान, साक्षरतेच्या पातळीत सातत्याने वाढ झालेली आहे. शिवाय आरोग्याविषयी सोई-सुविधांचा वेगाने विकास व विस्तार झाल्याने जन्मदर आणि मृत्युदर कमी होऊन ऊन सरासरी आयुर्मानात वाढ झाली आहे. यावरून भारतीय अर्थव्यवस्था ही एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था आहे असे म्हणता येते.

५) संक्रमणशील स्वरुप :

उदयोन्मुख अर्थव्यवस्था या संक्रमणशील असतात. उदयोन्मुख अर्थव्यवस्था अथवा बाजारपेठा या बंदिस्त अर्थव्यवस्थेकडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमण करत असतात. आंतरराष्ट्रीय व्यापार मुक्त करून इतर देशांच्या बाजारांमध्ये विस्तार करण्याचा प्रयत्न करत असतात. भारताने सन १९९० च्या दशकात स्वीकारलेल्या खुल्या व्यापार धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था ही एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये देशांतर्गत उद्योगांमध्ये स्पर्धाक्षमता विकसित करण्यासाठी संरक्षणात्मक उपाय कमी केले जात आहेत. शिवाय देशांतर्गत बाजारपेठेतील संरक्षणात्मक उपायदेखील कमी केले जातात. याचा परिणाम म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेचे बंदिस्त अर्थव्यवस्थेकडून अर्थव्यवस्थेकडे होत आहे. म्हणूनच भारताची अर्थव्यवस्था अलीकडच्या काळात उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हटले जाते.

६) संरचनात्मक बदल

जागतिक बाजारपेठेमध्ये उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अलीकडच्या काळात महत्त्वपूर्ण संरचनात्मक बदल होत

आहेत. इतर क्षेत्रांच्या तुलनेने भारतीय शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होऊन उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे. रोजगारनिर्मिती आणि निर्यातीच्या बाबतीतदेखील हेच चित्र दिसून येते. १९५०-५१ मध्ये शेतीतील रोजगारनिर्मितीचे प्रमाण ७० टक्के होते. सन १९७०-७१ मध्ये ते ६८.७ टक्क्यांपर्यंत कमी झाले. सन १९९-९१ मध्ये ते ५८.२ टक्के इतके कमी झाले तर सन २०१८-१९ च्या आकडेवारीनुसार ४८.९ टक्क्यांपर्यंत कमी झालेले आहे. अर्थात, उद्योग आणि सेवाक्षेत्राचा रोजगारनिर्मितीमधील वाटा वाढत गेला आहे.

७) सेवाक्षेत्रातील मूलभूत बदल :

भारतीय आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सन १९८० च्या दशकापर्यंत सेवाक्षेत्राला फारसे महत्त्व नव्हते. त्यामुळे त्याचा फारसा विकास झाला नाही. तरीही १९५०-५१ ते १९७९-८० या कालखंडात सेवाक्षेत्राची यात ४.६ टक्क्यांनी झाली. सन १९९५-९६ मध्ये या क्षेत्राचा विकासाचा दर ६.५ टक्के राहिला. तर २०१८-१९ मध्ये हा दर वाढून १८.९ टक्के इतका अधिक झालेला आहे. परिणामी, देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील सेवाक्षेत्राचा वाटा हा ६० टक्के एवढा वाढला आहे. कारण आर्थिक सुधारणा कालखंडात वाहतूक व संदेशवहन, पायाभूत सुविधा, माहिती-तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, बँकिंग व विमा इत्यादींमध्ये प्रचंड प्रगती झाली. अलीकडच्या काळात सेवाक्षेत्रासोबत व्यापारक्षेत्राचादेखील वेगाने विकास झालेला दिसतो. यावरून भारतीय अर्थव्यवस्था एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था असते.

८) मानवी भांडवलाच्या गुणवत्तेत वाढ :

देशातील मानवी भांडवलाचा दर्जा शिक्षण, आरोग्य आणि लोकसंख्येची दशवार्षिक वाढ यावरून निश्चित केला जातो. देशातील शिक्षणाचा दर्जा शिक्षणाची सुगमता, एकूण साक्षरता दर (स्त्री व पुरुष साक्षरता दर), शालेय गळतीचे प्रमाण कमी असणे यांसारख्या घटकांचा अभ्यास करून शिक्षणविषयक निर्देशांक मांडला जातो. पोषण

दर्जा, स्वच्छतेची स्थिती, जन्माच्या वेळेचे आयुर्मान, अर्भक मृत्युदर, बाल मृत्युदर, माता मृत्युदर यांच्या स्थितीवरून आरोग्यविषयक स्थिती लक्षात येते.

आर्थिक विकास व लोकसंख्यावाढीचा दर यांचा परस्परसंबंध खूप महत्त्वाचा असतो. कभी विकसित देश्यात लोकसंख्यावाढीचा दर अधिक असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे वितरण व्यवस्थेवर ताण निर्माण होऊन त्याचा परिणाम आर्थिक विकासावर होतो. पर्यायाने सामाजिक विकासावरदेखील होतोच. अलीकडच्या काळात शिक्षण व आरोग्यविषयक सुविधांमध्ये वेगाने वाढ झाल्याने भारताच्या शिक्षण आणि आरोग्यविषयक निर्देशांकामध्ये वाढ होत आहे. यावरून असे लक्षात येते की, भारताच्या मानवी भांडवलाचा दर्जा मध्ये सुधारणा होत आहे.

१) माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा गतिमान विकास:

भारताच्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात अलीकडच्या काळात वेगवान विकास होत आहे. विविध आव्हाने आणि मर्यादा असूनही भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात सर्वांगीण प्रगती केली आहे. अवकाश आणि अणू ऊर्जा यांसारख्या क्षेत्रातील देशाची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या राष्ट्रीय कार्यक्रमातुन भारतीय अर्थव्यवस्थेने या बाबतीत सातत्याने पुढाकार घेतला आहे.

२०१७ मध्ये भारतीय अवकाश संस्थेने एकाच अंतराळ यानावर १० प्रक्षेपित केले आणि यापूर्वी आपले पहिले मंगळ अभियान साध्य केले. या कामगिरीमुळे देशाची जागतिक तांत्रिकदृष्ट्या अति प्रगत देशामध्ये गणना केली जाऊ लागली आहे. या सर्व बाबींवरून भारतीय अर्थव्यवस्था एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था असल्याचे लक्षात येते.

१०) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक

१९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या माध्यमातून स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन दिल्याने विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये वेगाने वाढ झाली आहे. आर्थिक सुधारणाच्या काळात भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. देशाच्या निर्यातयोग्य वस्तू व सेवांमध्ये गुणात्मक, संख्यात्मक आणि दर्जात्मकदृष्ट्या लक्षणीय फरक पडला. सुरुवातीच्या काही वर्षांत अत्यंत मंद गतीने वाढत असलेल्या गुंतवणुकीत अलीकडच्या काही वर्षात झपाट्याने वाढ झाली.

भारतीय अर्थव्यवस्थेची वरील सर्व वैशिष्ट्ये विचारात घेता नजीकच्या काळात विकसित अर्थव्यवस्थेवी पातळी गाठू शकते. वेगवान आर्थिक विकास, विदेशी प्रत्यक्ष गुतवणुकीतील वाद, राहणीमानाच्या दर्जात सुधारणा, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण, प्राथमिक क्षेत्राकडून दुय्यम व तृतीय क्षेत्राकडे होणारे स्थलांतर माहिती तंत्रज्ञानाचा विकास, शिक्षण, आरोग्य, बँकींग व विमा यामध्ये झालेली प्रचंड प्रगती यावरून भारतीय अर्थव्यवस्था ही एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था असल्याचे स्पष्ट होते.

१.२.४ जागतिक अर्थव्यवस्थेतेयशेयर भारतीय अर्थव्यवस्थेची तुलना:

भारतीय अर्थव्यवस्था ही एक विकसनशील व कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांच्या अहवालानुसार वर्ष २०१८ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ७.४ टक्के होता. वर्ष २०१९ मध्ये हा दर ७.८% राहील. तसेच २०१४-१५ ते २०१८-१९ या काळात भारतीय अर्थव्यवस्था सरासरी ७% वार्षिक वृद्धीदराने विकसीत होणारी जगातील एकमेव अर्थव्यवस्था आहे. वर्ष २०१९ मध्ये भारताचे सामान्य स्थूल देशांतर्गत उत्पन्न २.९८ लाख कोटी अमेरिकन डॉलरपर्यंत वाढते. याआधारे भारत ही जगातील ५ व्या क्रमांकाची सर्वात

मोठी अर्थव्यवस्था आहे तर खरेदी शक्ती समता (PPP) नुसार भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न ११.५ लाख कोटी डॉलरपर्यंत वाढले याआधारे भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेची विकासाची वाटचाल अशीच राहिली तर IMF च्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारत ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होईल. अतिरिक्त लोकसंख्या वाढीमुळे भारताचे दरडोई राष्ट्रीय उत्पन्न तुलनेने फारच कमी आहे. वर्ष २०१९ मध्ये भारताचे सामान्य स्थूल घरगुती दरडोई राष्ट्रीय उत्पन्न २९९९ डॉलर एवढे होते. यानुसार जगात भारतीय अर्थव्यवस्थेचा क्रमांक १४२ वा आहे. तर खरेदी शक्ती समता स्थूल देशांतर्गत दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ८४८४ डॉलर एवढे होते आणि जगात भारतीय अर्थव्यवस्थेचा क्रमांक ११९ वा लागतो. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, लोकसंख्या, कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रातील विकास यावरुन देशाच्या विकासाची स्थिती लक्षात येते. याद्दष्टीने विचार करता भारतीय अर्थव्यवस्थेची जागतिक स्तरावरील स्थिती लक्षात घेण्यासाठी तिचे तुलनात्मक स्थान विचारात घेणे आवश्यक ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेतील ठराविक घटकाच्या आधारे जागतिक अर्थव्यवस्थेशी तुलना पुढील प्रमाणे करता येईल.

(अ) राष्ट्रीय उत्पन्न :

एका विशिष्ट कालखंडात देशात उत्पादित झालेल्या अंतिम वस्तु व सेवांचे मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. भारतात हा कालखंड १ एप्रिल ते ३१ मार्च असा असतो. आर्थिक विकासाची तुलना करण्यासाठी व त्या देशाची आर्थिक

विकासाची स्थिती लक्षात घेण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना अत्यंत उपयोगी असल्याचे दिसून येते. यु एस ए जपान, जर्मनी आणि चीन या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न भारतापेक्षा अधिक आहे. म्हणून या देशाचा आर्थिक विकास भारताच्या तुलनेत अधिक असल्याचा निष्कर्ष काढता येतो. तसेच रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न भारतापेक्षा कमी असल्यामुळे रशियाचा आर्थिक विकास भारताच्या तुलनेत कमी आहे. असे म्हणता येते. थोडक्यात, राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून देशाच्या विविध झालेली प्रगत देशातील लोकांचे आर्थिक कल्याण व आर्थिक विषमतेची स्थिती लक्षात येते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या मध्ये राष्ट्रीय उत्पनाची जागतिक अर्थव्यवस्थेशी तुलना महत्वाची ठरते.

भारतीय अर्थव्यवस्थेची जगातील विविध देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाशी तुलना (२०१९-२०)

| देश | एकूण राष्ट्रीय उत्पन्न बिलियन डॉलर मध्ये | जागतिक उत्पन्नाशी प्रमाण (%) |
|---|---|---|
| अमेरिका | २१६१५ | २४.३४ |
| जर्मनी | ४०३८ | ४.५५ |
| युनायटेड किंग्डम | २८२१ | ३.१८ |
| कॅनडा | १७४२ | १.९६ |
| फ्रान्स | २८४६ | १.५० |
| ऑस्ट्रेलिया | १३९७ | १.५७ |
| जपान | ५२६६ | ५.९३ |
| चीन | १४५५५ | १६.३९ |
| भारत | २८९३ | ३.२६ |
| जागतिक | ८८७९२ | १००.०० |

वरील तक्त्यात जगातील प्रमुख देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाची भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाशी तुलना केली आहे. २०१९ साली जागतिक स्तरावरील विविध देशाचे राष्ट्रीय उत्पन्न विचारात घेतले असता, अमेरिका, जर्मनी, जपान या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न इतर देशांच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येते, भारताचे राष्ट्रीय उत्पन्न या विकसित देशाच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे जागतिक राष्ट्रीय उत्पन्नाची प्रमाण हे केवळ २.२६ टक्के एवढेच आहे. यावरून देशातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर मानव संसाधनाचा विकास, नवीन तंत्रज्ञान, नवप्रवर्तन इत्यादी च्या माध्यमातून आर्थिक विकासाला गती देऊन (राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे.

(ब) लोकसंख्या :

लोकसंख्येचा आकार, लोकसंख्येचा वृद्धीदर धनता, शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण, जन्मदर व मृत्युदर, सरासरी आयुर्मान अशा अनेक बाबतीत भारताची विकसित देशाबरोबर तुलना केल्यास त्यात मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते. उच्च जन्मदर व कमी झालेला मृत्युदर यामुळे भारतात अतिरिक्त लोकसंख्येचे संकट निर्माण झाले आहे. भारताची लोकसंख्येच्या बाबतीत विकसीत देशाबरोबर तुलना पुढील मुद्द्याच्या आधारे करता येईल,

(१) लोकसंख्येचा आकार :

भारतातील लोकसंख्येचे आकारमान जगातील इतर देशांच्या लोकसंख्येच्या तुलनेत फार मोठे आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने नंतर भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत व चीन या दोन देशातील लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ३५ टक्के आहे. २०१९ सालापर्यंत भारताची लोकसंख्या १३६.९ कोटी पर्यंत वाढली आहे. अमेरिकेची लोकसंख्या ३२.९ कोटी असून, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांची

लोकसंख्या दहा कोटी पेक्षाही कमी आहे. परंतु या देशांचा जागतिक उत्पन्नातील वाटा मात्र अधिक आहे.

२) लोकसंख्येचा वृद्धीदर

लोकसंख्येच्या वृद्धिदरावर लोकसंख्या वाढीचा वेग अवलंबून असतो. जागतिक स्तरावर इतर देशांच्या तुलनेत भारतातील लोकसंख्येच्या वृद्धिदर अधिक असल्याने भारतातील लोकसंख्येचे आकारमान जास्त आहे. २०१८ साली जागतिक लोकसंख्येचा वृद्धिदर १.०७ टक्के होता. तर भारताच्या वृद्धिदर १.०८ टक्के होता.

३) जन्मदर व मृत्यूदर :

भारतातील दर हजारी जन्मदर १९ आणि मृत्युदर ७.३ एवढा आहे. मृत्यूदराच्या तुलनेत जन्मदर अधिक असल्यामुळे भारतातील लोकसंख्या वेगाने वाढली आहे. मोनको या देशाचा जन्मदर सर्वात कमी ६.९४ एकता कमी आहे, तर जपान, जर्मनी, बल्गेरिया, ग्रीस, दक्षिण कोरिया, स्विझर्लंड इत्यादी देशाचा जन्मदर १० पेक्षा कमी आहे. थोडक्यात जगातील विकसित देशात जन्मदर व मृत्युदर यातील फरक कमी असल्याने लोकसंख्या बाढीचा वेग कमी आहे. याउलट भारतात जन्मदर व मृत्युदर यातील फरक अधिक असल्याने लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे.

४) लोकसंख्येची घनता :

लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौरस किलोमीटर मध्ये राहणारी लोकसंख्या होय. भारताची लोकसंख्येची 'धनता दर चौरस किलोमीटर ४१६ एवढी आहे. जगाची लोकसंख्येची घनता ५८.६७ एवढी आहे. जगातील १२ देशातील लोकसंख्येची घनता १००० पेक्षा जास्त आहे. लोकसंख्येच्या घनतेच्या बाबतीत जगात भारताचा ३१ वाक्रमक आहे. जगाच्या सरासरी लोकसंख्येच्या घनतेच्या तुलनेत भारताची लोकसंख्येची घनता जवळपास ७ पट जास्त आहे.

५) स्त्री-पुरूष प्रमाण :

दर हजार पुरूषांमागे असणारे स्त्रियांचे प्रमाण म्हणजे स्त्री-पुरुष प्रमाण होय. भारतात हे प्रमाण कमी होत आहे. मानवी समाजात पर्यावरणाच्या दृष्टीने लिंगोत्तर १५० असणे अनुकूल ठरते. वर्ष २०११ मध्ये भारतातील सी पुरूष प्रमाण ९४३ एवढे होते तर जगात सरासरी हे प्रमाण ९८२ एवढे होते. जगातील जवळपास १६० देशांत जागतिक सरासरीपेक्षा लिंग गुणोत्तर जास्त आहे. भारतात मात्र सरासरीपेक्षा हे प्रमाण कमी आहे.

६) आयुर्मान :

व्यक्ती जन्मानंतर सरासरी किती वर्ष जगू शकतो, यास 'आयुर्मान' म्हणतात. वर्ष २०१७ मध्ये भारतीयांचे सरासरी आयुर्मान ६८.८ वर्षे एवढे आहे. स्त्रियांचे आयुर्मान ७०.४ वर्षे आणि पुरुषाचे आयुर्मान ६७.३ वर्षे एवढे होते. याच वर्षांत जगातील आयुर्मान ७२.२ वर्ष होते. सियांचे आयुर्मान ७४.४ वर्षे आणि पुरुषाचे आयुर्मान ७०.१ वर्षे एवढे होते. यावरुन भारतीयांचे आयुर्मान तुलनेने कमी आहे.

(७) प्रीड साक्षरता :

भारतात मनुष्यबळाच्या विकासाच्या दृष्टीने प्रौढ साक्षरता महत्वाची ठरते. १५ वर्षे व त्यावरील साक्षरता म्हणजे प्रौढ साक्षरता होय. भारतात प्रौढ साक्षरतेचे प्रमाण ६५५% होते तर जागतिक प्रौढ साक्षरतेचे प्रमाण ८५% एवढे होते. यावरून भारतातील प्रौढ साक्षरतेचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

(क) भारतातील कृषी क्षेत्र :

अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या कामगिरीवरून देशांच्या आर्थिक विकासाची दिशा आणि गती निश्चित होते. जगातील प्रमुख विकसित अर्थव्यवस्था या उद्योगप्रधान आहेत कारण त्या देशांच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिक क्षेत्राचे योगदान तुलनेने अधिक व महत्वपूर्ण आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान व

विकसनशील अर्थव्यवस्था आहे. अर्थव्यवस्थेतील उद्योग व सेवा क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा वाढत असताना शेतीक्षेत्राला सर्व अर्थाने अनन्यसाधारण महत्व आहे अथवा शेतीक्षेत्राची कामगिरी महत्वपूर्ण आहे. जागतिक उत्पादनात कृषीक्षेत्राचा सरासरी वाटा ६.४% एवढा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल भारतीय शेतीक्षेत्र आणि देशांतर्गत उत्पादनत कृषीक्षेत्राचा वाटा १३.९४१६ आहे. तो जगातील विकसित देशांच्या तुलनेत जास्त आहे. जगातील विकसित देशात कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिक याचे प्रमाण १ ते ४ टक्के एवढे आहे. तर भारतात हे प्रमाण ५४ टक्के एवढे आहे. याचाच अर्थ रोजगाराच्या दृष्टीने भारतात शेती हा सर्वात मोठा व्यवसाय आहे. जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थान निश्चित करताना भारतीय कृषी क्षेत्र आणि जागतिक कृषी क्षेत्र यांची तुलना पुढील मुद्याच्या आधारे करता येईल

१) पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र :

देशातील पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रावरून शेतीउत्पादन व उत्पादकता निश्चित होते. २००५ ते २०१६ या काळात जगातील एकूण लागवडीखालील क्षेत्र १२५५ दशलक्ष हेक्टर वरून १३८५ दशलक्ष हेक्टरपर्यंत वाढले तर याच काळात भारतातील लागवडीखालील क्षेत्र १८२ दशलक्ष हेक्टर वरून १९४ दशलक्ष हेक्टर पर्यंत वाढले आहे. हे जगातील एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या १४ टक्के आहे व भारतात जगाच्या एकूण लोकसवी जवळपास १८% लोकसंख्या भारतात राहाते.

२) पीक रचना :

एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी विविध पिकांच्या खालील लागवडक्षेत्र म्हणजे पीक वर्ष २०१५ १६ मध्ये जगात गव्हाच्या पिकाखालील लागवडक्षेत्र २२४ दशलक्ष हेक्टर आणि भारतातील ३२ दशलक्ष हेक्टर म्हणजेच जगाच्या १४.०७% क्षेत्र भारतात गव्हाच्या पिकाखाली आहे. याच वर्षात भाताच्या पिकाखालील जगातील एकूण क्षेत्र

१५२ दशलक्ष हेक्टर आणि भारतातील २५ दशलक्ष हेक्टर याप्रमाणे २७.०९९% ए आहे. याच संदर्भिय वर्षात तृणधान्य खालील एकूण लागवडक्षेत्र हे ३२३ दशलक्ष हेक्टर आणि भारताने तृणधान्य खालील लागवडक्षेत्र ४४ दशलक्ष हेक्टर जगाच्या ७.५९% आहे. थोडक्यात भारतातील आणि जगातील प्रमुख पिकाखालील क्षेत्राच्या प्रमाणात मोठी तफावत दिसून येते.

३) कृषी क्षेत्राची दर हेक्टरी उत्पादकता:

सर्वसाधारणपणे एका हेक्टरमध्ये विशिष्ट पिकाचे किती उत्पादन होते, यावरून शेतीची उत्पादकता मोजली जाते. भारतातील प्रमुख पिकांच्या बाबतीत शेतीची उत्पादकता तुलनेने कमी आहे. वर्ष २०१५-१६ मध्ये गव्हाची जगातील प्रति हेक्टरी उत्पादकता ३.२९ टन एवढी होती तर भारताची गव्हाची उत्पादकता २.७ टन एवढी आहे. तृणधान्याची जागतिक उत्पादकता ३.९ टन आणि भारताची १.३८ टन आहे. भाताचे जागतिक उत्पादकता ४.४२ टन प्रति हेक्टर होती तर भारताची ती ३.६० टन एवढी आहे. कापसाची हेक्टरी उत्पादकता जगाची १४३ किलोग्रॅम आणि भारताची ४५८ किलोग्रॅम होती, याचाच अर्थ असा की भारताची शेती उत्पादकता जगाच्या तुलनेत कमी आहे.

(४) रोजगार निर्मितीत कृषी क्षेत्राचा वाटा :

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती हा सर्वात मोठा व्यवसाय असून, विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशात शेती क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण अधिक दिसून येते. भारतात आजही रोजगारनिर्मितीत शेती क्षेत्राचे योगदान सर्वात जास्त आहे. जगात शेती क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे सरासरी प्रमाण २८% आहे तर भारतात हेच प्रमाण ५४% आहे. विकसित देशात हे प्रमाण फारच कमी आहे. म्हणजे ११% ते ४% एवढेच राहिले आहे. याचा अर्थ देशाचा जसजसा विकास होत जाईल तसतसा रोजगार निर्मितीत कृषी क्षेत्राचा वाटा कमी होत जातो.

५) कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :

अर्थव्यवस्थेतील क्षेत्रीय कामगिरी ही देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात क्षेत्रीय योगदान किती आहे, यावरून त्या क्षेत्राचे महत्व ठरते. जगाच्या एकूण उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा वर्ष २०१६-१७ मध्ये ६.४% एवढा होतो, अमेरिकेत शेतीक्षेत्राचा वाटा ९%, जर्मनीत ६%, फ्रान्स २७, जपान मध्ये १% एवढा होता. तर भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा १३.९४१४ एवढा होता. तो जगाच्या तुलनेत जास्त आहे.

६) एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा :

जागतिक स्तरावर विकसित देशांच्या एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा कमी आहे तर विकसनशील देशांच्या एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा अधिक आहे. भारताच्या एकूण निर्यातीत कृषी क्षेत्राचा वाटा तुलनेने जास्त आहे. वर्ष २०१७-१८ मध्ये कृषी निर्यातीचे प्रमाण देशात १२.८% होते. अमेरिकेचा हा वाटा ३.९% व जर्मनीचा वाटा ०.५% एवढा होतो. भारताचा एकूण निर्यातीतील कृषी निर्यातीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. ते वर्ष १९७०-७१ मध्ये ३२१% होता. तो वर्ष २०१७-१८ मध्ये १२.८१% पर्यंत कमी झाला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे स्वात्र्योत्तर काळात कृषी आधारित उद्योगांचा विकास आणि उद्योग व सेवा क्षेत्राच्या निर्यातीत सातत्याने होत असलेली वाढ आहे.

ड) उद्योग क्षेत्र :

नियोजन काळात भारतात आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. ज्यामुळे वेशात मोठ्या व लघू उद्योगांची वाढ झाली, उद्योग क्षेत्रांचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढला, सन २०१७ मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा भारतात २७ टक्के होता तर जपान

(२८%), जर्मनी (२६%) असे होते. सन २०१७ मध्ये भारतातील उद्योग क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण २२.३ टक्के होते तर जर्मनी (२८.५१%) व जपान (२३.३%) असे होते.

भारतात उद्योगाच्या विकासामुळे आर्थिक विकासाला गती मिळाली आहे. भारतीय उद्योग क्षेत्रामध्ये ONGC रिलायन्स इंडस्ट्रीज, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, NTPC, SAL. TCS, इन्फोसिस यांसारख्या उद्योगांचा मोठा सहभाग आहे. रोजगार उपलब्धतेत उद्योग क्षेत्राचे योगदान आजही सेवाक्षेत्रानंतर अधिक म्हणजे २२१% एवढे आहे. देशाच्या एकूण निर्यातीत औद्योगिक क्षेत्राचे योगदान हे सर्वात अधिक आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशात उद्योगधंद्याची स्थापना होऊन औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने जगात आज भारताचा क्रमांक १२ वा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व उद्योग क्षेत्राचा वाटा कमी होऊन सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे. भारतातील औद्योगिक क्षेत्राची तुलना जागतिक अर्थव्यवस्थेतील उद्योग क्षेत्राच्या कामगिरीशी करण्यासाठी पुढील मुद्द्याचा आधार घेता येईल.

१) राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा :

जागतिक पातळीवर विकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा वाटा हा सेवा क्षेत्राच्या विकासामुळे वाढलेला दिसून येत नाही, भारताच्या बाबतीत राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा कमी होत असताना औद्योगिक क्षेत्राच्या वाट्यात वाढ झाली आहे. वर्षे २०१६-१७ च्या आकडेवारीनुसार अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नात उद्योगक्षेत्राचा वाटा १८.९०१%, इंग्लंडच्या राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योगक्षेत्राचा वाटा १९%, जपानच्या राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योगक्षेत्राचा वाटा २९.७% आणि जर्मनीच्या राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योगक्षेत्राचा वाटा ३०.१% एवढा होता तर भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात उद्योगक्षेत्राचा वाटा हा २४.२१% एवढा होता. याचाच अर्थ

विकसित देशातील राष्ट्रीय उत्पन्नात उद्योगक्षेत्राचा वाटा आणि भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात उद्योगक्षेत्राचा वाटा यात फारशी तफावत दिसून येत नाही मात्र प्रगत देशाच्या तुलनेत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील औद्योगिक क्षेत्राचा वाटा विशेषतः अमेरिकेच्या तुलनेत खूपच कमी आहे.

२) रोजगार निर्मितीत औद्योगिक क्षेत्राचा वाटा :

रोजगारनिर्मितीत औद्योगिक क्षेत्राच्या कामगिरीची तुलना केली असतात भारतात एकूण रोजगार निर्मितीला औद्योगिक क्षेत्राचे योगदान २२९% एवढे आहे. तर एकूण रोजगार निर्मितीत उद्योगक्षेत्राचे योगदान कॅनडा १९%, अमेरिका २०.३%, ऑस्ट्रेलिया २१.९%, जपान २६.२%, फ्रान्समध्ये २४.३९% आणि जर्मनीत २४.६% असे होते. थोडक्यात रोजगार निर्मितीच्या दृष्टीने भारतीय औद्योगिक क्षेत्राचे योगदान जास्त आहे. जगातीक स्तरावर एकूण रोजगारात उद्योगक्षेत्राचा वाटा वर्ष २०१८ मध्ये २३% होता, तर भारताच्या एकूण रोजगारात उद्योगक्षेत्राचा वाटा २५१% होता. यावरून जगाच्या तुलनेत भारताच्या उद्योगक्षेत्राचे रोजगार निर्मितीत योगदान अधिक असल्याचे दिसून येते.

३) औद्योगिक क्षेत्राचा वृद्धीदर:

अर्थव्यवस्थेच्या विकासाची दिशा व गती ही औद्योगिक क्षेत्राच्या वृद्धीदरावर अवलंबून असते, सन २००८ पासून जागतिक स्तरावर मंदी सारखी परिस्थिती निर्माण झाल्याने औद्योगिक उत्पादनाचा वृद्धीदर पटला असला तरी भारतातील औद्योगिक उत्पादनाचा वृद्धीदर तुलनेने समाधानकारक राहिला आहे. वर्ष २००८ ते २०१७ या काळात औद्योगिक उत्पादनाचा सरासरी वृद्धीदर कॅनडा ९%, जर्मनी १%, तर भारताचा औद्योगिक उत्पादनाचा वृद्धीदर सरासरी ८.५% राहिला आहे.

४) औद्योगिक क्षेत्रातील उत्पादकता आणि उत्पादनाचा दर्जा :

भारतासारख्या विकसनशील देशात विकसित देशाच्या तुलनेत अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रचंड भांडवल उपलब्धता, उच्च प्रशिक्षित व विकसीत मनुष्यबळ, कार्यक्षम व्यवस्थापन आणि विक्री व्यवस्था यांचा अभाव दिसून येतो. परिणामी औद्योगिक क्षेत्राची उत्पादकता आणि उत्पादनाचा दर्जा तुलनेने कमी आहे.

५) भारतातील सेवा क्षेत्र:

जगातील सर्वच देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होत असताना अर्थव्यवस्थेत संचरचनात्मक बदल घडून आले आहेत. याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेतील कृषी व उद्योग यांच्या तुलनेत सेवा क्षेत्राचा 'विकास वेगाने होत आहे. तसेच देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी व उद्योग क्षेत्राचा वाटा कमी होऊन सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सद्यस्थितीत सेवा क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. २०१९ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा वाटा ६३९% एवढा होतो तर भारतीय अर्थव्यवस्थेतील वाटा ६१.८६% एवढा होता. भारतातील सेवा क्षेत्राची जागतिक अर्थव्यवस्थेशी तुलना पुढील मुद्द्याच्या आधारे करता येईल.

१) राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचे योगदान :

जसजसा अर्थव्यवस्थेचा विकास होत जातो तसतसे अर्थव्यवस्थेतील प्राथमिक, दुय्यम व तृतीय क्षेत्राच्या योगदाना मध्ये बदल होतो. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्रात चे महत्व कमी होऊन इतर क्षेत्राचे महत्व वाढत असेल तर त्यास संरचनात्मक बदल असे म्हणतात,

जागतिक अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान कृषी व उद्योग क्षेत्राच्या तुलनेत अधिक आहे. १९५०-५१ ते २०१७-१८ या काळात जगाच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा संतत वाढत आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा वर्षे १९५०-५१ ला ३३.५१% होता तो वर्षे २०१८

१९ मध्ये ६१.८६% पर्यंत वाढला आहे. याच काळात जगाच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचाही वाटा ४०% वरून ६३% पर्यंत वाढला आहे. विकसित देशाची तुलना करता देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा अमेरिकेमध्ये ७९.७%. कॅनडामध्ये ७६%, जर्मनीत ७४.३%, फ्रान्समध्ये ७२.४% आणि जपानमध्ये ७२.४% आहे. या तुलनेत भारताच्या सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तुलनेने कमी आहे..

(२) सेवा क्षेत्राचा वृद्धीदर :

जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार जगातील वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राच्या वृद्धीदराची तुलना करता चीनच्या सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ९.८ टक्के तर भारताच्या सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ७.१% व त्यानंतर स्पेनच्या सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ७ टक्के आहे. यावरून जगातील विकसित देशाच्या तुलनेत भारताच्या सेवा क्षेत्राचा वृद्धीदर अधिक असल्याचे स्पष्ट होते.

३) सेवा क्षेत्र आणि रोजगार निर्मिती :

जगातील एकूण रोजगारनिर्मितीत सेवा क्षेत्राचे योगदान अधिक आहे. वर्ष २०१८ मध्ये जगातील एकूण रोजगारात सेवा क्षेत्राचा वाटा ४९ टक्के होता. तर याच वर्षात भारताच्या एकूण रोजगारात सेवा क्षेत्राचा वाटा ३१ टक्के एवढा होता. याचा अर्थ जागतिक स्तरावर सेवा क्षेत्राची रोजगार निर्मितीत योगदान भारताच्या तुलनेत अधिक आहे. आजही भारत सेवा क्षेत्राच्या विकासात वाढ करून त्याचे एकूण रोजगार निर्मितीतील योगदान वाढविण्यासाठी वाव आहे.

४) निर्यातीतील सेवा क्षेत्राचे योगदान :

निर्यातीच्या दृष्टीनेही सेवा क्षेत्राचे जगातीक व देश पातळीवर महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. वर्ष २०१७ मध्ये जगाच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राच्या निर्यातीचा वाटा २४% होता तर या वर्षी भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राच्या निर्यातीचा

वाटा सर्वात अधिक म्हणजे ३८% एवढा होता. जगाच्या तुलनेत भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राचा वाटा अधिक असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे अर्थव्यवस्थेत होत असलेले संरचनात्मक बदल आणि आर्थिक सुधारणा व सरकारचे बदलती धोरणे याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राच्या कामगिरीत महत्वपूर्ण बदल झाले आहेत. जागतिक स्तरावर कृषी व उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवा क्षेत्राचे महत्त्व वाढताना दिसून येत आहे.

SBM RAJGURUNAGAR Eco.